सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. २६ मे २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ४२ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## ‘पेपरफुटीप्रकरणी NTA ने अद्याप कोणताही धडा घेतलेला नाही’ : सर्वोच्च न्यायालय

वृत्तसंस्था

नवी दिल्ली: नॅशनल टेस्टिंग एजन्सी (छ्ढ-) कडून वारंवार होणाऱ्या पेपर लीकच्या घटनांवर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. न्यायालयाने दिलेल्या अनेक निर्देशांनंतरही एजन्सी भूतकाळातील वादांमधून कोणताही धडा शिकलेली नाही, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार, एनटीए आणि केंद्रीय अन्वेषण ब्यूरो कडून उत्तर मागवले आहे. आज सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालय म्हणाले, हे अत्यंत खेदजनक आहे. पेपरफुटीप्रकरणी त्यांनी (नॅशनल टेस्टिंग एजन्सी) अजूनही कोणताही धडा घेतलेला नाही, आम्ही यासाठी एक समिती देखील स्थापन केली होती.’फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडिकल असोसिएशन’ आणि ’युनायटेड डॉक्टर्स फ्रंट’ यांनी आपल्या याचिकेत एनटीए (छ्ढ-) बदलण्याची किंवा तिच्या रचनेत पूर्णपणे सुधारणा करण्याची मागणी केली आहे. ’नीट-युजी’ (छएएढ-णत्र) परीक्षा आयोजित करण्यासाठी अधिक सुरक्षित आणि स्वायत्त यंत्रणा उभारण्यात यावी, असे निर्देश देण्याची विनंती न्यायालयाला केली आहे.’नीट’ पेपरफुटी विवादामुळे न्यायालयाच्या आदेशानुसार स्थापन करण्यात आलेल्या देखरेख समितीने केलेल्या शिफारशींच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने NTM ला दिले आहेत. तसेच उच्चस्तरीय समिती शिफारशींचे पालन सुनिश्चित करण्यासाठी काय पावले उचलली गेली, याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करण्यास न्यायमूर्ती राधाकृष्णन यांनाही सांगण्यात आले आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, हे प्रतिज्ञापत्र तीन दिवसांच्या आत दाखल करावे लागेल.२०२६ ची परीक्षा पेपर लीकच्या आरोपांमुळे रद्द करण्यात आली होती. परीक्षार्थ्यांमध्ये परीक्षेच्या काही आठवडे आधीच एक कथित गेस पेपर (अंदाजित प्रश्नपत्रिका) फिरत असल्याचे पुरावे तपासकर्त्यांना आढळले होते. आता ही पुनर्रचना केलेली परीक्षा २१ जून रोजी होणार असून, या प्रकरणाची पुढील सुनावणी शुक्रवार, २९ मे २०२६ रोजी निश्चित करण्यात आली आहे.



### भाजप-महायुती विधानपरिषदेच्या सर्व १७ जागा जिंकणार

तभा वृत्तसेवा

मुंबई :विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुती सर्वच्या सर्व १७ जागांवर निर्भेळ यश मिळवेल, असा दावा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी केला आहे. महायुतीमध्ये जागावाटपाचा फॉर्म्युला जवळपास निश्चित झाला आहे. तिन्ही पक्षांचे ९९ टक्के जागांवर एकमत झाले असून, लवकरच उमेदवारांची घोषणा केली जाईल, अशी माहितीही त्यांनी दिली.नागपूर विधानपरिषद पोटनिवडणुकीचा उल्लेख करत बावनकुळे म्हणाले, नागपूरमध्ये एकूण ८०० मतांपैकी जवळपास ६०० मते एकट्या भाजपकडे आहेत. त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी विनंती मी काँग्रेससह सर्वच पक्षांना केली आहे. ज्या ठिकाणी विरोधकांकडे संख्याबळ जुळत नाही, तिथे उगाच खर्च करण्यापेक्षा निवडणुका बिनविरोध कराव्यात. याबाबत मी स्वतः हर्षवर्धन सपकाळ, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यासह सर्वच प्रमुख नेत्यांना विनंती करणार आहे. निवडणुकांमध्ये लागणारे डिझेल-पेट्रोल आणि पैसा वाचवण्याच्या दृष्टीने सर्वांनीच सकारात्मक प्रतिसाद देणे गरजेचे आहे.महायुतीच्या जागावाटपाबाबत बोलताना ते म्हणाले की, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी संभाव्य उमेदवारांच्या नावांची यादी केंद्रीय नेतृत्वाकडे पाठवली आहे. दिल्लीतील केंद्रीय समिती ज्या दिवशी या नावांवर शिक्कामोर्तब करेल, ती नावे अंतिम होतील. महायुतीमधील जागावाटपाचा फॉर्म्युला जवळपास ठरला असून ९९ टक्के जागांवर तिन्ही पक्षांचे एकमत झाले आहे.

### रिक्षाचालकांचे धाबे दणाणले

ठाणे : राज्यातील रिक्षाचालकांना मराठी भाषा येणे बंधनकारक करण्याच्या मुद्द्यावरून सध्या राजकीय आणि सामाजिक वातावरण चांगलंच तापलं आहे. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी रिक्षाचालकांना मराठी येणे आवश्यकच असल्याची आक्रमक भूमिका घेतल्यानंतर आता प्रत्यक्ष कारवाई सुरू झाली आहे. ठाण्यात आरटीओने विशेष आणि धडक तपासणी मोहीम सुरू केली असून, रस्त्यांवर रिक्षाचालकांच्या मराठी ज्ञानाची थेट परीक्षा घेतली जात आहे. मराठी सक्तीच्या अधिकृत अंमलबजावणीला १५ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असली, तरी ठाणे आरटीओच्या पथकांनी शहरातील विविध भागांमध्ये अचानक तपासणी सुरू केल्याने परप्रांतीय आणि अमराठी रिक्षाचालकांचे धाबे दणाणले आहेत.

### भावूक होऊ नका...!

नवी दिल्ली: देशात मागील काही दिवसांपासून ’कॉकरोच जनता पार्टी’ ही उपहासातून तयार झालेली डिजिटल संघटना चांगलीच चर्चेत आहे. सरन्यायाधीशांच्या टिपण्णीचा उपरोधिक शब्दांत विरोध करण्यासाठी ही संघटना स्थापन करण्यात आली होती. मात्र या ’कॉक्रोच जनता पार्टी’ (सीजेपी)च्या उपक्रमांची आणि बोगस वकिलांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. या याचिकेवर भाष्य करताना सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी याचिकाकर्त्यांच्या वकिलांना म्हटलं आहे की, या प्रकरणात इतके भावुक होण्याची आवश्यकता नाही.

### नायकवाडी राजीनामा देणार ?

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्यपाल नियुक्त आमदार इद्रीस नायकवाडी यांना पक्षनेतृत्वाने राजीनामा देण्याचे निर्देश दिल्याची माहिती समोर आली आहे. खुद्द उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या सूचनेवरून राजीनाम्याची मागणी करण्यात आल्याची चर्चा असून, नायकवाडी यांच्या कार्यशैलीवर युवा नेतृत्व नाराज असल्याचे कळते आहे. मात्र, आपण राजीनामा देणार नसल्याची भूमिका नायकवाडी यांनी घेतल्याने पक्षात नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.अलीकडेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या विशेष कार्य अधिकाऱ्याने (ओएसडी) इद्रीस नायकवाडी यांची भेट घेतली होती. याच भेटीत त्यांना पक्षाच्या वतीने राजीनामा देण्याची सूचना देण्यात आल्याचे समजते. मंगळवारी मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली असून, या बैठकीत नायकवाडी यांच्या राजीनाम्याचा विषय चर्चेला येण्याची दाट शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे.

### कोकणवासी दुहेरी कोंडीत

मुंबई-गोवा महामार्गावर रायगड जिल्ह्यातील खारपाडापाठोपाठ खांब येथेही टोलवसुली सुरू करण्याच्या हालचाली सुरू असताना महामार्गावरील प्रवाशांचा वाहतूककोंडीचा जाच रविवारी आणखी वाढला. रायगडमधील माणगाव-इंदापूर आणि रत्नागिरीतील संगमेश्र्वर परिसरात वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्याने प्रवासी, पर्यटकांचे हाल झाले. महामार्गाचे काम पूर्ण झालेले नसताना टोलवसुली सुरू असल्याने प्रवाशांच्या संतापात वाहतूककोंडीने भर टाकली.

### आंबेनळी घाटात अपघात

रायगड : साताऱ्यातील आसगाव येथील तरूणांच्या स्कॉर्पिओ गाडीचा रायगडमधील पोलादपूर आणि महाबळेश्र्वर दरम्यान असलेल्या आंबेनळी घाटात भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये ८ तरुणांचा जागीच मृत्यू झाला. स्कॉर्पिओ सुमारे १००० फुट खोल दरीत कोसळली. आसगावमधील हे तरूण कोकणात दापोली येथील हर्णे बीच येथे फिरायला गेले होते. मजामस्ती करुन ते परतीच्या प्रवासाला लागले होते, पण आंबेनळी घाटात दबा धरुन बसलेल्या मृत्यूने झडप घातली आणि आज पहाटे हा अपघात झाला.

## यूपीएससी प्रिलिम्सने उमेदवारांसह अधिकाऱ्यांनाही फोडला घाम!

वृत्तसंस्था

नवी दिल्ली :आता अजून एक प्रयत्न करावा की सोडून द्यावं?... णझडउ ची तयारी करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांच्या मनात रविवारी हाच प्रश्न होता. UPSC CIVIL SERVICES PRELIMINARY EXAMINATIO२०२६ ची परीक्षा दिल्यानंतर अनेक उमेदवार प्रचंड निराश आणि संभ्रमात दिसले. विशेषतः GENERAL STUDIES (GS) PAPER १ हा पेपर अत्यंत कठीण, लांबलचक आणि गोंधळात टाकणारा असल्याची भावना उमेदवारांनी व्यक्त केली आहे.२०२२ पासून UPSC ची तयारी करणाऱ्या अनुभव गुप्ता या विद्यार्थ्याने परीक्षेनंतर सोशल मीडियावर पोस्ट करत, आता थांबायचं का, की अजून एक प्रयत्न करायचा? असा प्रश्न विचारला. चार प्रयत्न झाल्यानंतर त्याच्यासारखे अनेक विद्यार्थी या परीक्षेनंतर खचलेले दिसत आहेत.णझडउ मार्गदर्शक शेखर दत्त यांनी सोशल मीडियावर ही परीक्षा आतापर्यंतच्या सर्वात कठीण णझडउ झीशश्रळाी पैकी एक असल्याचे म्हटले. रायपूरमधील ख-ड अधिकारी अवनीश शरण यांनीही UPSC PRELIMS 2026: THE TOUGHEST EVER अशी प्रतिक्रिया दिली. दत्त यांच्या मते, या वेळी खरी अडचण फक्त माहिती असण्यात नव्हती, तर वेगवेगळ्या तथ्यांमधील संबंध समजून घेणे आणि मर्यादित वेळेत योग्य निर्णय घेणे ही मोठी कसोटी होती.णझडउ ची परीक्षा नेहमीच अनपेक्षित प्रश्नांसाठी ओळखली जाते. मात्र यंदाच्या GS पेपरने अनेक उमेदवारांना पूर्णपणे गोंधळात टाकल्याचं दिसून आलं. काही शिक्षकांच्या मते, पेपर फक्त कठीण नव्हता, तर अत्यंत अनपेक्षित (UNPREDICTABLE) होता. प्रश्नांचा पॅटर्न पूर्णपणे बदललेला दिसला. यापूर्वी सरळ प्रश्न विचारले जात असताना यंदा अनेक प्रश्नांमध्ये वेगवेगळ्या तथ्यांना -, इ, उ अशा स्वरूपात जोडून संबंध शोधण्यास सांगितले गेले.शेखर दत्त यांच्या मते, यंदाच्या पेपरमधील सर्वात मोठा बदल म्हणजे प्रश्नपत्रिकेची लांबी. पूर्वी १०० प्रश्नांची प्रश्नपत्रिका साधारण ४0 पानांची असायची. मात्र यंदा ती ५६ पानांपर्यंत पोहोचली. काही पानांवर फक्त दोनच प्रश्न होते,

कारण प्रत्येक प्रश्न खूप मोठा आणि वेळखाऊ होता. त्यांनी सांगितले की, पूर्वी एका पानावर सात-आठ प्रश्न असायचे. आता एका चउट साठी जवळपास अर्धं पान वाचावं लागत होतं. याचा परिणाम असा झाला की, अनेक उमेदवारांना सर्व प्रश्न सोडवता आलेच नाहीत. एका विद्यार्थिनीने सांगितले की, विषय माहित असूनही ती १०० पैकी फक्त ६६ प्रश्न सोडवू शकली.




## विधान परिषद निवडणुकीपूर्वी राजकीय खळबळ; काँग्रेसचे ६0 नगरसेवक ‘नॉट रिचेबल’

तभा वृत्तसेवा

नागपूर :महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण तापू लागलं असून, पूर्व विदर्भात मोठ्या राजकीय घडामोडींना वेग आला आहे. महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जागावाटपाचे अंतिम चित्र अद्याप स्पष्ट झाले नसतानाच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मतदारांची पळवापळवी सुरू झाल्याची चर्चा रंगली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी थेट घोडेबाजाराचे गंभीर आरोप केले आहेत. चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील काँग्रेसचे तब्बल ६0 हून अधिक नगरसेवक अचानक संपर्काबाहेर गेल्याची माहिती समोर आली आहे. विशेषतः सिंदेवाही नगरपंचायतीचे नगराध्यक्ष आणि काही महत्त्वाचे नगरसेवकांचे मोबाईल फोन ‘नॉट रिचेबल’ लागत असल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. यावर बोलताना काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनीभाजपवरअप्रत्यक्ष निशाणा साधत, सध्या निवडणुका म्हणजे उत्सव झाले आहेत. आमच्याही संपर्कात भाजपचे १०० हून अधिक नगरसेवक आहेत. त्यांच्या पक्षातही अंतर्गत वाद आहेत. दुसरा गट तयार आहे आम्हाला मदत करायला, परंतु आम्ही त्या भानगडीत पडत नाही, असे वडेट्टीवार म्हणाले.माझ्या माहितीप्रमाणे काही नगरसेवकांना पाच पाच लाख देऊन काही नगरसेवकांना उचलायचं काम चाललेलं आहे. २०१४ पासून सर्वांनाच ही सवयी लावली आहे, यामुळे प्रामाणिकनिवडणूकहोण्याची आणि योग्य माणसाची निवड होण्याची शक्यता नाही, यात मोठमोठे उद्योगपती येतील. राजकारण, समाजसेवा ही काही प्रामाणिक माणसांची राहिलेली नाही. आता तर ती पूर्ण उद्योगपतींच्या हातात जाईल, त्याला समाजाशी काही देणंघेणं असणार नाही. उद्योगपती , ठेकेदार, मोठ मोठे कंत्राटदार हे आता भविष्यात विधानसभेमध्ये, विधानपरिषदेमध्ये हेच चेहरे दिसतील म्हणजे सामान्य माणूस कुठेच दिसणार नाही, अशा प्रकारची परिस्थिती भविष्यात आपल्याला पाहायला मिळेल, असंही वडेट्टीवार म्हणाले. विधान परिषदेसाठी शिवानी वडेट्टीवार यांचे नाव चर्चेत असल्याबाबत विचारले असता वडेट्टीवार म्हणाले की, अद्याप कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही. वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरू आहे.

भाजपचा उमेदवार कोण असेल आणि त्यांची रणनीती काय असेल, हे पाहून आम्ही निर्णय घेऊ. एकीकडे प्रचंड धनशक्ती आहे, आणि मोठमोठे उमेदवार आहेत, जो काही आता रेट आहे तो पंधरा लाख रुपयांचा रेट खुलल्याची माहिती आमच्याकडे आहे. आता पंधरा लाख एका नगरसेवकाला दिल्यानंतर हा मोठा उत्सव झालेला आहे. मला वाटतं लोकशाही भविष्यात शिल्लक राहील की नाही हा खरा प्रश्न आहे, असेही वडेट्टीवार म्हणाले.



## बाल भवनच्या नूतनीकृत इमारतीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण

तभा वृत्तसेवा

मुंबई :महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन, मुंबई या नुतनीकृत वास्तूचे लोकार्पण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते चर्नी रोड येथे करण्यात आले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, शिक्षणमंत्री दादाजी भुसे, कौशल्य रोजगार व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबई महानगरपालिका महापौर रितू तावडे, माजी शिक्षणमंत्री आ. दीपक केसरकर यांच्या उपस्थितीत हा लोकार्पण कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की , ७५ वर्षानंतर बालभवन या इमारतीचे अतिशय सुंदर रीतीने नूतनीकरण करण्यात आलेलं आहे. लहान बालकांसाठी सर्व सुविधा येथे उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. मुलांना विविध कला, कौशल्य, खेळ शिकता येईल, नाविन्यपूर्ण समजून घेता येतील. येथे विविध पद्धतीचे वाद्य-संस्कृती असेल, त्यासंदर्भात प्रशिक्षण इथे घेता येईल. आपल्या मुलांकरता, पालकांसाठी एक अतिशय सुंदर अशा प्रकारची वास्तू तयार झाली आहे. मी स्वतः, मुंबईचे महापौर आणि मुंबईचे आयुक्त यांना विनंती करणार आहे की, त्यांनी आपल्या महानगरपालिकेच्या शाळांमध्ये जी मुले आहेत, त्यांना या ठिकाणी आणावे आणि त्यांनाही इथल्या सगळ्या वातावरणाचा आनंद घेण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. दरवर्षी १ लाख विद्यार्थ्यांसाठी येथे सुविधा उपलब्ध करण्यात आल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. तसेच बालभवनाची पाहणी करून शिक्षणमंत्री दादा भुसे यांचे अभिनंदन केले.यावेळी, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार म्हणाल्या की, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल आणि भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या वास्तूच्या नव्या इमारतीच्या लोकार्पण सोहळ्यास उपस्थित राहण्याचे भाग्य लाभणे ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. नव्या इमारतीमुळे विद्यार्थ्यांना अधिक आधुनिक सुविधा उपलब्ध होणार असल्याचा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.मुले ही राष्ट्राची संपत्ती असून, त्यांच्या कलागुणांना वाव देण्याचे आणि त्यांना योग्य दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ही संस्था करत आहे. नव्या वास्तूमुळे महाराष्ट्रातील बालकांच्या कल्पकतेला नवे पंख मिळतील, असेही त्यांनी सांगितले.माहिती आमच्याकडे आहे. आता पंधरा लाख एका नगरसेवकाला दिल्यानंतर हा मोठा उत्सव झालेला आहे. मला वाटतं लोकशाही भविष्यात शिल्लक राहील की नाही हा खरा प्रश्न आहे, असेही वडेट्टीवार म्हणाले.



## प्रा. शिवराज मोटेगावकरांच्या संपत्तीवर ईडीची नजर

तभा वृत्तसेवा

लातूर :प्रा. शिवराज मोटेगावकरांच्या संपत्तीवर ईडीची नजर देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट-यूजी परीक्षा पेपरफुटी प्रकरणाला आता एक मोठे आर्थिक वळण मिळाले आहे. या घोटाळ्याचा तपास करणाऱ्या केंद्रीय अन्वेषण विभागाच्या अटकेनंतर आता अंमलबजावणी संचालनालय म्हणजेच ईडीने या प्रकरणात अधिकृत एन्ट्री केली आहे. लातूर येथील प्रसिद्ध ’आरसीसी’ कोचिंग क्लासेसचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर आता ईडीच्या रडारवर आले असून, त्यांच्या अफाट संपत्तीची आणि मनी लाँड्रिंगच्या कोनातून चौकशी सुरू झाली आहे.सीबीआयने केलेल्या अटकेनंतर या घोटाळ्यात कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाल्याचे समोर आले आहे. त्यानंतर ईडीने मोटेगावकर यांच्यावर आपला फास आवळण्यास सुरुवात केली आहे. ईडीने शिवराज मोटेगावकर आणि त्यांच्या जवळच्या नातेवाईकांच्या सर्व बँक खात्यांचे तपशील गोळा करण्यास सुरुवात केली आहे. नीट परीक्षेचे मूळ प्रश्न मॉक टेस्ट किंवा गेस पेपरच्या नावाखाली विद्यार्थ्यांना देण्यासाठी पालकांकडून लाखो रुपयांची रोख रक्कम उकळण्यात आल्याचा संशय आहे. हा पैसा कुठे व कसा वळवण्यात आला, याचा माग ईडी घेत आहे. आरसीसी क्लासेसच्या महाराष्ट्रातील ९ शाखा, कार्यालये आणि मोटेगावकरांच्या इतर मालमत्तांची चौकशी केली जात असून, गुन्ह्यातून कमावलेल्या पैशातून ही संपत्ती उभी राहिली आहे का, याचा तपास सुरू आहे.यापूर्वी सीबीआयने धक्कादायक खुलासे झाले आहेत. ३ मे रोजी झालेल्या नीट परीक्षेच्या तब्बल १० दिवस आधी, म्हणजेच २३ एप्रिल २०२६ रोजीच शिवराज मोटेगावकर यांच्या मोबाईलवर नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिका आली होती. नॅशनल टेस्टिंग एजन्सी साठी मराठी भाषांतरकार म्हणून काम करणारे निवृत्त केमिस्ट्री प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी (ज्यांना आधीच अटक झाली आहे) यांच्याशी मोटेगावकरांचे थेट कनेक्शन होते. कुलकर्णी यांच्याकडूनच मोटेगावकरांना पेपर मिळाल्याचा संशय आहे.

सीबीआयने मोटेगावकरांच्या लातूर येथील शिवाजी नगर भागातील निवासस्थानावर आणि आरसीसी क्लासेसवर टाकलेल्या छाप्यात एक केमिस्ट्री क्वेश्र्चन बँक जप्त केली आहे. या क्वेश्र्चन बँकेतील तब्बल ४२ प्रश्न मुख्य नीट परीक्षेत जसेच्या तसे (हुबेहूब) आल्याचे फॉरेन्सिक तपासणीत स्पष्ट झाले आहे. लातुरात हा प्रकार एका पालकाने पोलिसांकडे केलेल्या तक्रारीनंतर समोर आला. त्यातच सोशल मीडियावर मोटेगावकरांचा एक व्हिडिओ प्रचंड व्हायरल झाला होता. या व्हिडिओमध्ये ते स्वतः विद्यार्थ्यांना विचारत होते की, आपल्या मॉक टेस्ट (सराव परीक्षा) मधील किती प्रश्न मुख्य परीक्षेत आले? त्यावर विद्यार्थ्यांनी अनेक प्रश्न जसेच्या तसे आले असे उत्तर दिले होते. हा व्हिडिओ आता सीबीआय आणि ईडीसाठी महत्त्वाचा पुरावा ठरला आहे.या प्रकरणात पुणे आणि लातूरमधील काही डॉक्टर, आयुर्वेदिक तज्ज्ञ आणि मध्यस्थांची साखळी कार्यरत असल्याचे स्पष्ट झाले असून, मनीषा हवालदार आणि मनीषा मांढरे या महिला आरोपींच्या घरातून लाखो रुपयांची रोकड, जळालेल्या प्रश्नपत्रिकांच्या नोट्स आणि संशयास्पद व्हॉट्सप चॅट्स हस्तगत करण्यात आले आहेत.

शिवराज मोटेगावकर यांच्यावर पुरावे नष्ट करणे, एनटीए अधिकाऱ्यांसोबत गुन्हेगारी कट रचणे यासाठी भारतीय न्याय संहिता, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा आणि सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) कायदा, २०२४ अंतर्गत अत्यंत गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आता ईडीच्या एन्ट्रीमुळे त्यांच्या अडचणीत प्रचंड वाढ झाली असून, महाराष्ट्रातील कोचिंग लॉबीचे मोठे रॅकेट उद्धस्त होण्याची शक्यता आहे



लातूर आणि पुण्यात मॅरेथॉन चौकशी केल्यानंतर शिवराज मोटेगावकर यांना रविवारी रात्री ताब्यात घेऊन दिल्लीत नेले होते, जेथे न्यायालयाने त्यांना ९ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे. सीबीआयच्या तपासात

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मध्यरात्री सापळा; 40 लाखांचा हायवा पकडला

## चंद्रलोक नगरी परिसरातील कारवाई, तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

कन्नड : दि.२५ मे - अवैध वाळू वाहतुकीविरोधात कन्नड शहर पोलिसांनी मध्यरात्री धडक कारवाई करत तब्बल ४० लाख ३० हजार रुपयांचा हायवा आणि वाळू जप्त केली. चंद्रलोक नगरी परिसरात सोमवारी (दि.२५) पहाटे तीनच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर परदेशी यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, एक टाटा कंपनीचा निळ्या-पांढऱ्या रंगाचा हायवा (एम.एच.20 एफ.एस.8901) वाळू भरून चंद्रलोक नगरीकडे येत आहे. त्यानुसार सहाय्यक पोलीस अधीक्षक अपराजिता अग्निहोत्री यांच्या सूचनेनुसार नाईट राऊंड पथकाने सापळा रचून वाहन ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान मोबीन राजू शेख (रा. किन्हाळ, ता. गंगापूर), अकील शकील पठाण (रा. किन्ही, ता. सोयगाव) व प्रविण अशोक दौंड (रा. पिंप्री अंटूर, ता. सोयगाव) हे विनापरवाना वाळू वाहतूक करत असल्याचे समोर आले. ही वाळू भडजगाव परिसरातील गिरणा नदी पात्रातून आणल्याची माहिती पुढे आली.

कारवाईत अंदाजे ४० लाख रुपयांचा टाटा हायवा व सुमारे ३० हजार रुपयांची तीन ब्रास वाळू असा एकूण ४० लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई सहाय्यक पोलिस अधिक्षक अपराजिता अग्निहोत्री यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस नाईक अमोल गायकवाड,पोलिस अंमलदार सतीश नरवडे, विजय चौधरी,नामदेव धोंडकर, यांच्या पथकाने केली.

दरम्यान कन्नड शहर व परिसरात रात्रीच्या वेळी अवैध वाळू वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याची चर्चा नागरिकांतून होत आहे. त्यामुळे महसूल व पोलिस प्रशासनाने संयुक्त कारवाई करत या प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२), ३(५) तसेच गौण खनिज कायद्यान्वये कन्नड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस निरीक्षक आर.वि.सानप यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ सुकेशनी कांबळे करीत आहेत

# बेवारस वाहनांच्या मालकांनी कागदपत्रांसह हर्सुल पोलीस ठाण्यात संपर्क साधावा

**छत्रपती संभाजीनगर,दि.२५** | शहर पोलीस दलांतर्गत येणाऱ्या हर्सुल पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध कारवायांमध्ये हस्तगत करण्यात आलेली आणि बेवारस स्थितीत मिळून आलेली दुचाकी व चारचाकी वाहने पोलीस ठाण्याच्या आवारात जमा आहेत. या जप्त करण्यात आलेल्या बेवारस वाहनांची कायदेशीर रितीने विल्हेवाट करण्यासाठी असल्याने, त्यांच्या मूळ मालकांचा शोध सुरु केला आहे. ज्या कोणत्याही व्यक्तीचा या वाहनांवर मालकी हक्क असेल, त्यांनी ०७ (सात) दिवसांच्या आत हर्सुल पोलीस स्टेशन येथे स्वतः हजर राहावे. वाहनांची मूळ अधिकृत कागदपत्रे सादर करून नागरिकांनी आपला मालकी हक्क सिद्ध करावा, असे आवाहन पोलीस निरीक्षकांनी केले आहे.

दिलेल्या ७ दिवसांच्या मुदतीत जर जप्त करण्यात आलेल्या या वाहनांवर कोणीही आपला कायदेशीर मालकी हक्क प्रस्थापित केला नाही, तर सदर सर्व बेवारस मालमत्ता शासकीय नियमांनुसार विल्हेवाट किंवा लिलाव प्रक्रियेत काढली जाईल. त्यानंतर कोणत्याही दाव्याचा विचार केला जाणार नाही. तक्रारदार नागरिकांना पडताळणीचे आवाहन

ज्या नागरिकांची वाहने हर्सुल किंवा परिसरातून चोरीला गेली आहेत अथवा हरवली आहेत, त्यांनी छत्रपती संभाजीनगर पोलीस विभागाच्या Psharsool.abad@mahapolice.gov.inया अधिकृत संकेतस्थळावर/ ईमेलवर प्रसिद्ध करण्यात आलेल्या वाहनांच्या यादीची पडताळणी करून घ्यावी.

जप्त केलेल्या वाहनाच्या यादीत एकूण ३० हून अधिक वाहनांचा समावेश आहे. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे आहेत. होंडा पॅशन (लाल रंग) MH-२०-CN-४४३२, हिरो होंडा स्प्लेंडर प्लस (निळे पट्टे) MH-२३-M-३६१९, पॅशन प्रो (लाल रंग) नंबर नाही, हिरो होंडा प्लस (काळा रंग) MH-२०-AW-२२६९, बजाज प्लॅटिना काळा रंग MH-२०-BC-८४१० , बजाज डिस्कव्हर (काळसर, लाल पट्टे) MH-१४-DW-९०६५, लाल रंगाची बजाज XCD MH-21-W-६१०९, हिरवट रंगाची ह्युंदाई कार MH-०४-AS-५८५०, पांढऱ्या रंगाची लोडिंग रिक्षा MH २३',३०४७, यामाहा,काळ्या रंगाची MH २८,p-१३७५,बजाज कावासाकी कॅलिबर, MH १४,N-१८४६, बजाज चेतक स्कूटर, MVF-५१३७, टीव्हीएस स्टार सिटी मोसा, MH -२०.BE-६४४२, पॅशन प्रो- MH १२,JV-६२०२,यासह अन्य वाहन हर्सूल पोलिस ठाण्यात निर्गती साठी ठेवण्यात आली आहे.मालकांनी हर्सूल पोलिस स्टेशनमध्ये संपर्क साधावा असे आवाहन पोलीस निरीक्षक, हर्सूल यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## सिल्लोड येथे आज पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**छत्रपती संभाजीनगर,दि.२५** | जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतिने मंगळवार दि.२६ रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सिल्लोड येथे पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात मेटलमन ऑटो लि., यशश्री प्रेस कॉम्प्स प्रा.लि., नहार ग्रुप इंडिया, व्हेरॉक इंजिनिअर लि. वाळूज, अशा चार आस्थापनांकडून १८६ रिक्तपदे प्राप्त झालेली असून ते प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखत घेणार आहे. त्यासाठी कोणत्याही शाखेची पदवी, इंजिनीअरींग, डिप्लोमा, आय टी आय, एच एस सी, एस एस सी उतीर्ण इत्यादी पात्रताधारक युवक युवतींना पात्रतेनुसार रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

## रामचंद्र लाठे यांनी SRPF या परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल सत्कार सोहळा संपन्न



**तभा.वृत्तसेवा**

सोयगाव,दि.२५ मे : येथील सोहणी सी.एस.सी.एस.सी.सेंटर येथे रामचंद्र लाठे यांनी SRPF या परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल सोयगाव येथील सामाजिक कार्यकर्ते रवींद्र काळे,गंगाधर सोहणी,कृषीभूषण शेतकरी अरुण सोहनी,भास्कर चौधरी हरिदास काटोले,प्रा कमलेश काळे याच्या हस्ते सत्कार सोहळा करण्यात आला.व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## थायरॉईड नोड्यूल्स बहुतेक वेळा निरुपद्रवी; योग्य तपासणी व उपचार गरजेचे – डॉ. स्नेहा डोंगरदिवे

छत्रपती संभाजीनगर, तभा वृत्तसेवा प्रतिनिधी : जागतिक थायरॉईड दिनानिमित्त थायरॉईड नोड्यूल्स अर्थात थायरॉईड ग्रंथीतील गाठींबाबत जनजागृती करण्यात आली. गळ्याच्या पुढील भागात असलेल्या थायरॉईड ग्रंथीमध्ये निर्माण होणाऱ्या गाठींना थायरॉईड नोड्यूल्स म्हटले जाते. या गाठी एक किंवा अनेक असू शकतात तसेच घन किंवा द्रवाने भरलेल्या स्वरूपात आढळतात. सुमारे ९० टक्क्यांहून अधिक गाठी या कर्करोग नसलेल्या व निरुपद्रवी असतात, अशी माहिती ईएनटी तज्ज्ञ डॉ. स्नेहा डोंगरदिवे यांनी दिली.




बहुतेक रुग्णांमध्ये कोणतीही लक्षणे दिसून येत नाहीत. मात्र गाठ मोठी झाल्यास मानेत सूज किंवा गाठ जाणवणे, गिळताना त्रास होणे, श्वास घेण्यास अडथळा येणे तसेच आवाज बसणे अशी लक्षणे दिसू शकतात. काही वेळा वजन कमी होणे, छातीत धडधडणे व जास्त घाम येणे अशी हार्मोनशी संबंधित लक्षणेदेखील आढळतात.

थायरॉईड ब्लड टेस्ट, गळ्याची सोनोग्राफी आणि एफएनएसी या चाचण्या निदानासाठी महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी सांगितले. गाठीच्या प्रकारानुसार नियमित निरीक्षण, औषधोपचार किंवा शस्त्रक्रिया केली जाते.



## त्र्यंबक कुर्लेकर यांचे निधन

**तभा.वृत्तसेवा**

सोयगाव,दि.२५ मे : आमखेडा-रामकृष्णा नगर येथील रहिवासी त्र्यंबक काशिनाथ कुर्लेकर(वय.८१)यांचे अल्पशा आजाराने सोमवार मंध्यरात्री ३:०० वाजता निधन झाले. त्यांच्यावर संध्याकाळी ५:०० वाजता त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,एक मुलगी,सुना,नातवंडे असा परिवार होत.रामलिंग कुर्लेकर यांचे वडील तर कृष्णा कुर्लेकर यांचे मोठे बंधू होत

## इंधन पुरवठा अखंडित ठेवण्यावर भर

छत्रपती संभाजीनगर: महाराष्ट्रआणि सर्वसामान्य जनतेची चोवीस तास सेवा करण्याच्या उद्देशाने इंडियनऑइलने आज रविवारी,जो साप्ताहिक सुट्टीचा दिवस असतो, तरीही आपल्या डेपो आणि टर्मिनलचे कामकाज सुरू ठेवलेआहे. अनेक भागांमध्ये इंधनाच्या मागणीत झालेल्या तीव्र वाढीच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल(MS), डिझेल (HSD) आणि एलपीजीचा अखंडित पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी हा निर्णय घेण्यातआला आहे. इंडियनऑइल सतत साठा स्थितीचाआढावा घेत असून वाढलेल्या मागणीच्या परिस्थितीला कार्यक्षमतेने प्रतिसाद देण्यासाठीलॉजिस्टिक्स आणि वितरण नियोजनावर बारकाईने समन्वय साधत आहे.

## आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित

छत्रपती संभाजीनगर: आपल्या सेवा क्षेत्रातील २० वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्यसाधत, स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने (एनएसई: स्टारहेल्थ; बीएसई:543412) महाराष्ट्रातील १५ ठिकाणी आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केलीआहेत. याद्वारे स्थानिक समुदायांपर्यंत मुलभूत तपासणी, आरोग्यजागरूकता आणि आजारांचे सुरुवातीच्या टप्प्यातच निदान करण्याची सुविधा पोहोचवण्यातआली. पुणे,सातारा,अहिल्यानगर,बारामती,दौंड,कोल्हापूर,धुळे,छत्रपती संभाजीनगर, जळगाव, अकोला,नांदेड,लातूर ,धाराशिव,नंदुरबार आणि बीड येथे हाउपक्रम राबवण्यात आला, जेथे वेळेवरनिदान आणि सक्रिय आरोग्य सेवेची व्यापक उपलब्धता वाढवण्यावर भर देण्यात आला.

# प्रस्तावित राजमाता घाट क्षेत्रातील 300 मिटर परिसरात काढले अतिक्रमण

**तभा वृत्तसेवा**

पैठण दि २५ :- पैठण गोदावरी पात्र पालखी ओटा शेजारील तारकेश्वर महादेव मंदिर समोरील क्षेत्रात प्रास्ताविक राजमाता जिजाऊ घाट कामात अडथळा ठरत असलेले अतिक्रमण सोमवारी सकाळ पासून तहसीलदार ज्योती पवार यांच्या उपास्थितीत मोठ्या पोलीस फौज फाट्यात काढण्यात आले. आता याठिकाणी ३०० मिटरच्या परिसरात वेगवेगळी थीम असलेला राजमाता जिजाऊ घाट उभारणीला वेग येणार आहे.





प्राचीन वाडे, घाटांचा शहर नाथांचीनगरी दक्षिण काशी धार्मिक पर्यटन नगरी पैठणला २०२२ साली राजमाता जिजाऊ घाटास महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळाली होती. यानंतर प्रसकीय मान्यता मिळून घाटाचे काम सुरु होणार होते. परंतु प्रस्तावित जागा दोन ठिकाणी स्थानिक मच्छीमार समाजाचा गाळपेरा आणि अतिक्रमण असल्याने या कामाला विलंब झाला. शेवटी पालखी ओटा ते नागघाट रोडवरील तारकेश्वर महादेव मंदीर, प्राचीन वड, नऊ सिड्या मंदिरा पर्यंताचे गोदावरी पात्र सुनिश्चित करण्यात आले. आणि त्याठिकाणी ही अतिक्रमण असल्याने घाट विरोधात हे नागरिक कोर्टात गेले. कोर्टाने त्यांची घाट कामाला प्राधान्य दिल्याने सोमवार दिनांक २५ मे रोजी सकाळी ११ वाजेपासून तहसीलदार ज्योती पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत अतिक्रमण ठिकाणावरील पत्राचे शेड, पिके जीसीबी व ट्रॅक्टरच्या साहाय्याने काढण्यात आली.

अतिक्रमण मोहिमेत तहसीलदार ज्योती पवार,न. प. मुख्याधिकारी डॉ. पल्लवी अंभोरे,बांधकाम विभागाचे उप अभियंता संभाजी शेळके,पोलीस निरीक्षक महादेव गोमारे,जे.ई. लक्ष्मण तनपुरे, जे. ई. सचिन शिंदे,न. प. उप मुख्याधिकारी सोमनाथ गर्जे. नागेश खोडवे, प्रकल्प अधिकारी धर्मराज उजगिरे, स्वच्छता प्रमुख गवांदे, अशोक पगारे, पाटीलबा घुले, अमोल शेजूळ,तलाठी, मंडळ अधिकारी ४५ पोलिसांचे पथक आदींचा समावेश होता जेसीबी ट्रॅक्टरच्या सहाय्याने हे अतिक्रमण काढण्यात आले.

विविध सुविधांसह उभारण्यात येणार राजमाता जिजाऊ नदीघाट विकास परियोजनेअंतर्गत तारकेश्वर महादेव मंदिर सोमोरील ३०० मिटरच्या गोदावरी पात्र ठिकाणी भव्य राजमाता जिजाऊ नदीघाट विविध संरक्षणात्मक व पर्यटनविषयक सुविधांसह उभारण्यात येणार आहेत. यामध्ये संरक्षण भिंत, प्रवाह बंधारे, सायकल ट्रॅक,प्रदर्शन दालने, खुले रंगमंच, मेडिटेशन सेंटर, फूड स्टॉल्स, जिम,गोदावरी नदीकाठलगत पादचारी मार्ग, , कारंजे, चबुतरे, व्यायामशाळा,, सायकल स्टँड, पार्किंग तसेच सार्वजनिक स्वच्छतागृह आदी कामांचा समावेश असणार आहे.यामुळे पैठण शहरातील पर्यटनाला चालना मिळून स्थानिकांना रोजगार मिळणार आहे.


# शहरात घरफोड्यांची मालिका सुरुच;दागिने व रोख रक्कम लंपास

## कन्नड शहरातील चोरीच्या घटनांनी नागरिकांत भीतीचे वातावरण

**तभा वृत्तसेवा**

कन्नड :दि.२५ मे - शहरातील वाढत्या चोरीच्या घटनांनी नागरिकांची झोप उडाली असतानाच आणखी एका घरफोडीच्या घटनेने खळबळ उडाली आहे. अज्ञात चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.





याबाबत प्रमोद शिंदे (रा. अयोध्या नगरी, नरसिंगपूर, कन्नड) यांनी कन्नड शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार, ते कुटुंबासह बाहेरगावी गेले असताना १४ मे ते २४ मे दरम्यान अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचा कडी-कोयंडा तोडून घरात प्रवेश केला. चोरट्यांनी कपाटातील सुमारे २५ ग्रॅम सोन्याचे गंठण, १२ ग्रॅम सोन्याची बाळी तसेच सुमारे २५ हजार रुपयांची रोख रक्कम असा ऐवज चोरून नेला.

घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. वारंवार होत असलेल्या घरफोडीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून रात्रीच्या गस्तीसह पोलिसांनी संशयितांवर कडक नजर ठेवावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

याप्रकरणी कन्नड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असून पुढील तपास पोलिस करत आहेत.

## एमजीएममध्ये कायद्याच्या क्षेत्रातील करिअर संधींसाठी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. २५ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लीगल स्टडिज अँड रिसर्चतर्फे कायद्याचे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, दिनांक २९ मे २०२६ रोजी दुपारी ३ वाजता आइन्स्टाईन सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे. कायदा क्षेत्रातील वाढत्या संधी लक्षात घेता विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना कायदा क्षेत्रातील करिअरच्या विविध संधी, प्रवेश परीक्षा, उच्च शिक्षणाचे पर्याय, न्यायव्यवस्था, वकिली, कॉर्पोरेट लॉ तसेच उदयोन्मुख कायदेविषयक करिअर याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात विधी क्षेत्रातील तज्ज्ञ आणि प्राध्यापक विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नांचे निरसन करणार आहेत. कायद्याचे शिक्षण घेण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांनी, पालकांनी तसेच इच्छुक उमेदवारांनी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. नांव नोंदणी व अधिक माहितीसाठी ९३७१७१४२६४ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे.

## शांती नर्सिंग होम येथे 'स्किझोफ्रेनिया डे' साजरा

छत्रपती संभाजीनगर : कांचनवाडी, पैठण रोडवरील शांती नर्सिंग होम येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही 'जागतिक स्किझोफ्रेनिया सप्ताह' साजरा करण्यात आला. या सप्ताहात रुग्ण व नातेवाईकांकरीता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. स्किझोफ्रेनियाग्रस्त रुग्णाच्या वैद्यकीय उपचारानंतरही आजाराची काही लक्षणे जसे की, बौद्धीक क्षमता पूर्ववत न होणे, एकाग्रता कमी होणे, भावनांचा बोथटपणा, कमी होत नाहीत. रुग्णाचे आयुष्य पूर्व पदावर आणण्याकरिता स्किझोफ्रेनियाग्रस्त रुग्णांचे पुनर्वसन करणे अत्यंत आवश्यक असते. शांती नर्सिंग होम येथे हे काम अनेक वर्षांपासून मोफत केले जात आहे. या वर्षी स्किझोफ्रेनिया दिनानिमित्त पुनर्वसन विभागातर्फे स्किझोफ्रेनिया आजार व उपचार तसेच पुनर्वसन या बद्दल शांती नर्सिंग होमच्या परिसरात विविध आरोग्य केंद्रांच्या ५० आशा वर्कर्सकरिता कार्यशाळा आयोजित केली होती. शांती नर्सिंग होम मधील मनोविकार तज्ञ व मानसोपचार तज्ञांनी मानसिक आजार समज गैरसमज, ताण-तणाव, व्यसनाधीनता, महिला व बाल मानसिक आरोग्य याबद्दल सहज व सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. त्याचबरोबर रुग्णांकरिता आठवडाभर ऑनलाइन ॲक्टीव्हिटीज् जसे की, चित्रकला, हस्तकला, पाककला, वृक्षारोपण, ब्रेन गेम्स इ. घेण्यात आल्या. स्किझोफ्रेनिया या आजाराबद्दल डॉ. निखिल खेडकर यांची आकाशवाणीतर्फे मुलाखत घेण्यात आली.

# शिवना नदी परिसरात नदी स्वच्छता अभियान उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

कन्नड :दि.२५ मे - श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, कन्नड यांच्या वतीने शिवना नदी परिसरात नदी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. हिवरखेडा रोडवरील भोलेश्वर कॉलनी येथील सेवेकऱ्यांनी अंबाडी मध्यम प्रकल्प परिसरात शनिवारी (दि.२३) हा उपक्रम उत्साहात पार पाडला.



परमपूज्य गुरुमाऊली यांच्या आशीर्वादाने तसेच नियोजनातून झालेल्या या अभियानात नदी परिसराची स्वच्छता करण्यात आली. यावेळी नदीचे पूजन करून सन्मान करण्यात आला. विपुल पर्जन्यवृष्टी व्हावी यासाठी सामूहिक पर्जन्य सूक्त पठण करण्यात आले. तसेच उपस्थितांनी स्वच्छता अभियानाची प्रतिज्ञा घेत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

विवाह संस्कार जिल्हा प्रतिनिधी लक्ष्मीकांत भाले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या उपक्रमात गणेश वाघ,निखिल नहाळे, विवाह संस्कार प्रतिनिधी सौ. छाया दुधकर, सौ. रुपाली पवार, केंद्र प्रतिनिधी सौ. मीनाक्षी चव्हाण, महिला सेवेकरी सौ. पुष्पा बोडखे, सौ. शिल्पा वाघ यांच्यासह विवाह संस्कार विभागातील सेवेकरी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सर्व सेवेकरी व नागरिकांनी मिळून अंबाडी धरण परिसर स्वच्छ केला.

# पर्वरीतील आमदार चषक स्पर्धेचे पेन्ह द फ्रांक वॉरियर्स आणि रवळनाथ युनायटेड संघ विजेते

## पर्वरी रायझिंगतर्फे आयोजित स्पर्धेच्या महिला लीग स्पर्धेची राज्यभर चर्चा

पर्वरी, दि. २५ मे २०२६ (प्रतिनिधी): पर्वरी मतदारसंघात प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या आमदार चषक महिला व पुरुष लीग क्रिकेट स्पर्धेचे अनुक्रमे पेन्ह द फ्रांक वॉरियर्स व रवळनाथ युनायटेड विजेते ठरले. खेळाडू आणि क्रिकेटप्रेमींकडून या आमदार चषक क्रिकेट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धेचे अंतिम सामने आज साल्वादोर द मुंद पंचायत मैदानावर खेळविण्यात आले. ही स्पर्धा २१ मे पासून सुरू झाली होती. महिला गटात पेन्ह द फ्रांक वॉरियर्स, संघाने शानदार खेळाच्या जोरावर विजेतेपद पटकाविले, तर साल्वादोर द मुंद, संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

ही स्पर्धा ४ षटकांची खेळविण्यात आली होती. महिला गटाच्या अंतिम सामन्यात विजेत्या संघाने प्रथम फलंदाजी करत उपविजेत्या संघासमोर १०५ धावांचे आव्हान उभे केले होते. मात्र प्रतिस्पर्धी संघाला निर्धारित षटकांत हे लक्ष्य गाठता आले नाही. त्यांचा डाव ४ गडी बाद ५४ धावांवर आटोपला. पुरुष गटात रवळनाथ युनायटेड संघाने दमदार कामगिरी करत विजेतेपदावर नाव कोरले, तर एटीबी बॉईज आल्त तोर्डा संघ उपविजेता ठरला. पुरुष गटाच्या अंतिम सामन्यातही रंगतदार लढत पाहायला मिळाली. विजेत्या संघाने आक्रमक फलंदाजीच्या जोरावर उपविजेत्या संघाला विजयासाठी १०८ धावांचे लक्ष्य दिले होते. ही स्पर्धा ५ षटकांची खेळविण्यात आली होती मात्र, उपविजेत्या संघाला निर्धारित षटकांमध्ये लक्ष्य गाठता आले नाही. स्पर्धेनंतर झालेल्या बक्षीस वितरण समारंभाला पर्वरीचे आमदार तथा राज्याचे पर्यटन व आयटी मंत्री रोहन अशोक खंवटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.




पारितोषिक वितरण समारंभाला मत्स्य व्यवसाय मंत्री निळकंठ हळर्णकर, उपसभापती जोशुआ डिसोझा, मांद्रेचे आमदार जीत आरोलकर, सांताक्रूझचे आमदार रुडॉल्फ फर्नांडिस आणि कुंभारजुवेचे आमदार राजेश फळदेसाई हे देखील उपस्थित होते. तसेच, साळगावचे आमदार आणि 'जीटीडीसी' चे अध्यक्ष केदार नाईक यांच्यासह डिचोलीचे आमदार आणि 'आयटी कॉर्पोरेशन'चे अध्यक्ष चंद्रकांत शेट्ये हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते.

यावेळी जिल्हा पंचायत सदस्य संदिप साळगांवकर, अमित अस्नोडकर, पेन्ह द फ्रांक सरपंच स्वप्नील चोडणकर, सुकूर सरपंच सोनिया पेडणेकर, पर्वरी भाजप मंडळ अध्यक्ष विनीत परब तसेच पंचसदस्य, क्रीडाप्रेमी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना मंत्री रोहन खंवटे यांनी सांगितले की, “गोव्यात प्रथमच महिला क्रिकेट संघांसाठी आमदार चषक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, ही केवळ क्रिकेट स्पर्धा नसून महिला सक्षमीकरणाच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### कायमस्वरुपी दिव्यांग बांधवांना परमनंट यूडीआयडी कार्ड द्या : प्रदेश सचिव इंजि. देवानंद हत्तीअंबीरे यांची मागणी : जिल्हा शल्य चिकित्सकांना निवेदन

**परभणी,/प्रतिनिधी :** ४० टक्के व त्यापेक्षा अधिक दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग बांधवांना परमनंट यूडीआयडी कार्ड देण्यात यावे, तसेच बंद झालेले मानधन, पेन्शन व इतर शासकीय लाभ तात्काळ सुरू करावा, अशी मागणी अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार) महाराष्ट्र प्रदेश सचिव इंजि. देवानंद हत्तीअंबीरे यांनी जिल्हा शल्य चिकित्सकांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्ह्यातील ४० टक्के व त्यापेक्षा अधिक दिव्यांगत्व असलेल्या अनेक दिव्यांग बांधवांना कायमस्वरूपी अपंगत्व असूनही यूडीआयडी कार्ड नूतनीकरणावेळी टेम्परररी (टी) यूडीआयडी कार्ड देण्यात येत आहे. पोलिओग्रस्त, दृष्टीहीन तसेच दीर्घकाळ पॅरालिसिस असलेल्या अनेक दिव्यांगांनाही वारंवार तात्पुरते यूडीआयडी कार्ड दिले जात आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांचे मानधन, पेन्शन तसेच विविध शासकीय योजनांचे लाभ बंद झाले आहेत. अनेक ठिकाणी टेम्पररी यूडीआयडी कार्ड ग्राह्य धरले जात नसल्याने दिव्यांग बांधवांना शासनाच्या योजनांपासून वंचित राहावे लागत आहे, अशी खंत हत्तीअंबीरे यांनी या निवेदनाद्वारे व्यक्त केली. तसेच वारंवार कागदपत्रे सादर करणे, कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण करणे यामुळे दिव्यांगांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

शासनाच्या यूडीआयडी मार्गदर्शक सूचनांनुसार ज्या दिव्यांगांचे अपंगत्व कायमस्वरूपी स्वरूपाचे आहे, अशा पात्र लाभार्थ्यांची योग्य वैद्यकीय तपासणी करून त्यांना परमनंट यूडीआयडी कार्ड देण्यात यावे, तसेच बंद झालेले मानधन, पेन्शन व इतर शासकीय लाभ तात्काळ सुरू करण्यात यावेत, अशी मागणी हत्तीअंबीरे यांनी या निवेदनाद्वारे केली आहे.

### १५ जून रोजी परभणीत मातंग समाजाचा आरक्षण आसूड महामोर्चा

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील मातंग समाजाच्या वतीने अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरणाच्या मागणीसाठी १५ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर आरक्षण आसूड महामोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चामध्ये हजारोंच्या संख्येने मांगवीरांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

मोर्चाच्या नियोजनासाठी शहरातील सावली विश्रामगृह येथे बैठक पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी ॲड. सुनील कसबे होते. प्रास्ताविक कॉ. एल. डी. कदम यांनी केले, सूत्रसंचालन अविनाश मोरे यांनी तर आभार प्रदर्शन रमेश गायकवाड यांनी केले.

बैठकीत वक्त्यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने आरक्षण वर्गीकरणाच्या बाजूने निकाल दिलेला असतानाही शासन आरक्षणविरोधकांच्या दबावाखाली येऊन या विषयावर टाळाटाळ करत आहे. त्यामुळे मातंग समाजामध्ये संतापाची लाट पसरली असून राज्यभर आंदोलने व मोर्चे सुरू आहेत. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय असतानाही शासन गुंडागर्दीला घाबरून संविधानाच्या संरक्षणाबाबत कचखाऊ भूमिका घेत असल्याचा संदेश समाजात जात असल्याची टीका यावेळी करण्यात आली. संविधान, सर्वोच्च न्यायालय आणि शासन यांची विश्वासार्हता कायम राखण्यासाठी अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरणाचा निर्णय तातडीने घेऊन त्याची अंमलबजावणी सुरू करावी, अशी मागणी बैठकीत करण्यात आली.

बैठकीस माजी कार्यकारी अभियंता मधुसूदन कांडलीकर, लखन पवार, दिलीप कांबळे, एल. डी. कदम, किशोर कांबळे, गजानन घोडके, अण्णासाहेब तोडे, राजेश उफाडे, गणपत भिसे, लक्ष्मण पारडे, रोहिदास खंदारे, दादाराव कांबळे, अशोक भारस्कर, उत्तम गोरे, सुनील लोंढे, सतीश मस्के, प्रकाश आगलावे, अशोक उबाळे, दीपक गवारे, विशाल वावळे, आकाश आंबोरे, रितेश मस्के, विशाल उबाळे, अण्णाभाऊ उबाळे, गणेश उबाळे, सुधाकर गायकवाड, अरुण सोनवणे, संविधान भिसे, विकास गोरे, रोहिदास नेटके, सारजाबाई भालेराव, अविनाश मोरे, माऊली साळवे, दीपक कांबळे पैलवान, कुणाल गायकवाड, अरुण सोणवणे, राणी गवळी, सपना पारवे आदी उपस्थित होते.

### मुलांमध्ये संस्कार रुजविण्यासाठी पालकांनी स्वत:च्या आचरणातून आदर्श निर्माण करावा : श्री गुरु ष. ब्र. १०८ सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज साखरखेर्डा यांचे प्रतिपादन

**परभणी,/प्रतिनिधी :** मुला-मुलींना पालकांच्या आचरणातून संस्कार मिळतात. त्यामुळे मुलांमध्ये संस्कार रुजविण्यासाठी पालकांनी स्वतःच्या आचरणातून आदर्श निर्माण करावा, असे प्रतिपादन श्री गुरु ष. ब्र. १०८ सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज साखरखेर्डा यांनी केले.

परभणी येथील जगद्गुरु पलसिद्ध स्वामी सेवाश्रम येथे राष्ट्रीय जंगम समाज संघटना व परभणी जिल्हा शाखेच्या संयुक्त विद्यमाने रविवारी भव्य जिल्हास्तरीय जंगम समाज मेळावा उत्साहात पार पडला. समाजातील युवक-युवती, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीत झालेल्या या मेळाव्यात रक्तदान शिबिर, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, बाल विकास व संगोपन, उद्योग मार्गदर्शन, धोंडे जेवण तसेच वधू-वर नोंदणी यांसारखे विविध उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन श्री गुरु ष.ब्र. १०८ सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज, साखरखेर्डा यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी राष्ट्रीय जंगम समाज संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रवण जंगम होते. प्रमुख उपस्थितीत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक प्रमुख वक्ते मनोहर भोळे स्वामी, बाल विकास व संगोपन मार्गदर्शक प्रा.विशाला पटनम, उद्योग विकास मार्गदर्शक मिलिंद वालवाडकर, चंद्रशेखर हुंडेकरी, त्र्यंबक पटवेकर, त्रंबक स्वामी कपाळे, बसवराज स्वामी, राजकुमार मठपती, श्रीशैल्य स्वामी, संगमेश्वर स्वामी, सुनील कबाडे व अरुण पेडगावकर परभणी जिल्हा अध्यक्ष राष्ट्रीय जंगम समाज संघटना विचार मंचावर उपस्थित होते. प्रारंभी पंच जगद्गुरु व महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित मान्यवरांचा शाल, पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

### परभणीकर झाले उकाडयाने हैराण

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरासह जिल्हयात मोठया प्रमाणात गरमीमुळे उकाडा वाढला आहे. रात्रीच्या सुमारास प्रंचड अशी गरमी नागरिकांना हैराण करुन सोडत आहे.त्यातच गेल्या दोन ते तीन दिवसापासून अवकाळी वारे व पावसाचे आगमन होत आहे, परंतू असे झाली तरी जमिनीतील आद्रता यामुळे चांगलीच वाढू लागली आहे. त्याचा परिणाम नागरिकांवर होत असून वयोवृध्द नागरिक, बालके, तसेच गंभीर आजारांच्या रुग्णांवर यामुळे चांगलेच परिणाम होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत जर उन्हाचा पारा घटला तरच नागरिकांना काहीअंशी या उकाडयापासून आराम मिळेल.

# स्पीडब्रेकरच झाले गायब?

## मुख्य रस्तावर वाढले अपघाताचे प्रमाण, शहर वाहतुक शाखेच्या हलगर्जीपामुळे वाहनधारकांचे हाल

**परभणी ,/प्रतिनिधी:-** महानगराच्या मध्यवस्तीतून जाणाऱ्या वसमत व जिंतूर हे दोन्ही महामार्ग पादचाऱ्यांसह वाहनधारकांच्या दृष्टीने अक्षरशः मृत्यूचे सापळे बनले आहेत. परंतु, या दोन्ही महामार्गावरील वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी कायमस्वरुपी व ठोस उपाययोजना अवलंबविण्याऐवजी शहर वाहतूक पोलिस यंत्रणेसह अन्य वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी केवळ एसपी साहेबांची मर्जी राखण्याकरीता पोलिस अधिक्षक कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर दोन ठिकाणी स्पीड ब्रेकर अंथरुन आपली कर्तव्यदक्षता व तत्परता दाखवली.

महानगरांतर्गत वसमत व जिंतूर हे दोन्ही रस्ते गेल्या कित्येक वर्षांपासून वाहतूकीच्या दृष्टीने अक्षरशः धोकादायक बनले आहेत. त्याची मूळ कारणेसुध्दा स्पष्ट आहेत. मूळात या दोन्ही महामार्गावरील एकेरी वाहतूक करणारे रस्ते अक्षरशः अरुंद आहेत. या एकेरी रस्त्यावरुन दोन चारचाकी वाहनेसुध्दा एकमेकांना ओव्हरटेक करु शकत नाहीत. या अरुंद रस्त्यावरुन जड वाहनांना ओव्हरटेकर करुन पुढे सरकने म्हणजे अक्षरशः मृत्यूला सामोरे जाण्यासारखेच आहे. त्यातच या दोन्ही अरुंद असणाऱ्या महामार्गावर दोन्ही बाजूंनी काही मालमत्ताधारकांनी बांधकामे करतेवेळी सर्व नियम, अटी व शर्ती नेहमीप्रमाणे खुंटीला टांगल्या, टोलेजंग संकुले, इमारती उभ्या केल्या. पार्कींग वगैरे गोष्टी धाब्यावर बसविल्या. त्यात पुन्हा व्यापाऱ्यांनी बेसुमार अतिक्रमणे करीत अगदी रस्त्यापर्यंत आपले बस्तान बसविले. तर त्यापुढे फुटपाथासह भर रस्त्यावरसुध्दा छोट्या मोठ्या हॉटेलधारकांसह पान टपऱ्या, भाजीपाला व फळ विक्रेत्यांनी मोक्याच्या व वर्दळीच्या भागातील जागा पटकावून ठाण मांडले. त्यामुळे अरुंद



असणारा दुतर्फा एकेरी मार्ग अधिकच अरुंद झाला. अन् वाहनधारकांच्या दृष्टीने तो जीवघेणा ठरला.

या दोन्ही महामार्गावर लांबपर्यंत वसाहती स्थिरावल्या आहेत. त्याबरोबरच मोठ मोठी दुकाने, शोरुम, एजन्सीज व मोठ मोठे हॉटेल्स रस्त्यापर्यंत भिडले आहेत. त्यातच शासकीय, निमशासकीय कार्यालये, बँका, खाजगी वित्तीय संस्था, पेट्रोलपंप, हॉस्पिटल्स, शाळा, महाविद्यालय, मंदिरे वगैरे वर्दळीची ठिकाणे रस्त्यालगत आहेत. त्यामुळे दोन्ही महामार्ग पहाटेपासून रात्री उशीरापर्यंत अक्षरशः वर्दळीचे बनले आहेत. शहराच्या चोहोबाजूंनी एकही बायपास रस्ता नाही. त्यामुळे बाहेरील जड वाहतूक मध्यवस्तीतूनच खूलेआमपणे सुरु आहे. त्याचा परिणाम अरुंद असणाऱ्या या रस्त्यावर वाहतूकीचा प्रचंड असा ताण आला आहे. त्याचा परिणाम शहर वाहतूक पूर्णतः कोलमडली आहे. छोटे मोठे अपघात नित्याचेच बनले आहेत. या अपघातांमधून शेकडोंचे बळी गेले आहेत. हजारो जायबंदी झाले आहेत. अपघातांच्या मालिकांना खंडच नाही. परंतु, महानगरपालिकेसह साखरझोपेतील शहर वाहतूक पोलिस यंत्रणेसह वरिष्ठ पोलिस अधिकारी व अन्य विभागांना त्याचे काहीही सोयरसुतक नाही. खासदार-आमदारांसह महापालिका पदाधिकारी व सदस्यांना वाहतूकीच्या कोंडीसह त्यासाठीच्या कायमस्वरुपी ठोस उपाययोजनेच्या प्रश्नांबाबत फारसे स्वारस्य नाही. तो प्रश्नच नाही, या अविर्भावात हे लोकप्रतिनिधी आजपर्यंत वावरत आले आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून सर्वसामान्यांनी कधीच अपेक्षाही व्यक्त केल्या नाहीत. त्याचा परिणाम वसमत व जिंतूर हे दोन्ही महामार्ग अक्षरशः बेवारस बनले आहेत.

## स्वाधार'' च्या अर्जातील त्रुटी दुरुस्तीसाठी २७ मेपर्यंत मुदत

**परभणी,/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेतंर्गत ज्या विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये त्रुटी आढळल्या आहेत, त्यांना त्रुट्या दुरुस्त करण्यासाठी २७ मे २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी मुदतीत त्रुटींची पुर्तता करावी, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त आर. एच. एडके यांनी केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या कालावधीसाठी ज्या विद्यार्थ्यांनी नवीन किंवा नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज भरले आहेत, अशा काही विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये तपासणीदरम्यान त्रुटी आढळल्या आहेत. त्यामुळे हे अर्ज दुरुस्तीसाठी संबंधित विद्यार्थ्यांच्या ''स्टुडेंट लॉगिन'' ला परत पाठविण्यात आले असून विद्यार्थ्यांनी आपल्या वैयक्तिक लॉगिनवर जावून आवश्यक ती कागदपत्रे, माहिती मुदतीपुर्वी अपलोड करून द्यावी. सविस्तर माहितीसाठी .. या संकेतस्थळाला भेट द्यावी तसेच त्रुटी पूर्तता करण्यासाठी ://.. या संकेत स्थळाला भेट द्यावी, असे कळविण्यात आले आहे.

## जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानातील कामे गतीने पूर्ण करा

**परभणी,/प्रतिनिधी-** यंदाचा खरीप हंगाम एल निनो, बदलते हवामान आणि जागतिक खत परिस्थितीमुळे आव्हानात्मक ठरण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांना वेळेवर कर्जपुरवठा, योग्य खत व्यवस्थापन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आव्हानांवर मात करून खरीप हंगाम यशस्वीपणे पार पाडू. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर राज्यात बियाण्यांचा पुरेसा साठा उपलब्ध असून शेतकऱ्यांना वेळेवर कर्जपुरवठा, जलसंधारणाची कामे आणि कृषी क्षेत्रातील डिजिटायझेशन यावर विशेष भर देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय खरीप हंगाम आढावा २०२६ बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, कृषि मंत्री दत्तात्रय भरणे, पणन मंत्री जयकुमार रावल, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, रोजगार हमी योजना फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले, कृषि राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, राज्यमंत्री पंकज भोयर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते कृषि क्षेत्रातील विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी जागतिक बँक आणि महाराष्ट्र शासन यांच्या भागीदारीत ओपन ॲग्री ट्रेसेबिलीटी स्टॅक ओटस चा लोकसंख्या पातळीवरील अन्न ट्रेसिबिलिटीसाठीची ब्लू-प्रिंटच्या प्रकाशन करण्यात आले. खरीप हंगाम बैठकीनंतर मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकार परिषद झाली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, यंदाच्या खरीप हंगामात हवामान बदल आणि एल निनोचे संभाव्य परिणाम लक्षात घेऊन कृषी विभागाने नियोजनबद्ध तयारी केली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार जूनमध्ये समाधानकारक पाऊस होण्याची शक्यता असली, तरी जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये पावसाचे प्रमाण कमी राहू शकते. हवामान विभागाच्या वेदर ॲडव्हायजरीच्या आधारे पीक नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्यात बियाण्यांची कोणतीही कमतरता नसून पुरेसा साठा उपलब्ध आहे. कापसाचे दर वाढल्यामुळे यंदा कापूस लागवड वाढण्याची शक्यता असून त्यानुसार आवश्यक नियोजन करण्याच्या सूचना कृषी विभागाला देण्यात आल्या आहेत.

## एससी प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रलंबित अर्ज; ३१ मे पूर्वी निकाली काढा; २५ मे रोजी बैठक झाली संपन्न

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या सुधारित धोरणानुसार महाडीबीटी प्रणालीचे व्हर्जन २.०० आगामी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून कार्यान्वित करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर जुन्या प्रणालीवरील प्रलंबित कामकाज पूर्ण करणे अनिवार्य आहे.




महाडीबीटी पोर्टलवरील विविध योजनांमध्ये अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे सन २०१९-२० ते २०२५-२६ या कालावधीतील अनेक अर्ज महाविद्यालय व विद्यार्थी स्तरावर प्रलंबित असल्याचे समोर आले आहे. हे सर्व अर्ज ३१ मे २०२६ पूर्वी निकाली काढणे बंधनकारक करण्यात आले आहे. विहित मुदतीनंतर अर्ज प्रलंबित राहिल्यास संबंधित विद्यार्थ्यांना ६० टक्के केंद्र हिश्श्याचा लाभ मिळणार नाही. अशा परिस्थितीत संबंधित महाविद्यालयांना जबाबदार धरण्यात येणार असल्याचे समाज कल्याण विभागाने स्पष्ट केले आहे. जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी २५ मे २०२६ रोजी दुपारी १.३० वाजता सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, जायकवाडी परिसर, परभणी येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीस जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांचे प्रतिनिधी तसेच शिष्यवृत्तीचे कामकाज पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण परभणी आर. एच. एडके यांनी केले आहे.

### जिल्हयातील शेतकरी लागला मशागतीच्या कामाला

**परभणी,/प्रतिनिधी:** जिल्हयातील शेतकरी हा गेल्या आठ ते दिवसापासून शेतीच्या मशागतीच्या कामाला लागला आहे. सध्या शेतात तणकट, जमिन वखरणे, सापसपाई करणे यासह धुऱ्यालगत असलेले नाला योग्य प्रमाणात साप करुन घेणे यासह एक न अनेक अशा सर्व कामास शेतकरी लागला आहे.

यावर्षी पावसाचे आगमन जुन महिन्यात मिरगाच्याच मुहूर्तावर होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आता पावसाची प्रतिक्षा लागलेली दिसून येत आहे. परंतू यावर्षीच्या शेती कामामध्ये डिझेल वेळेवर भेटत नसल्यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे यावर्षी नैसर्गीक संकटापेक्षा मानवी सकंट मोठे झाले असल्याचे चित्र दिसून येत आहे.



## अचानक आलेल्या वादळी पावसामुळे मटकराळा येथील सोलार पंपचे मोठे नुकसान

**परभणी /प्रतिनिधी-** परभणी तालुक्यात अचानक झालेल्या वादळी पावसामुळे मटकराळा येथील शेतकऱ्यांच्या शेतात बसवलेल्या सोलार पंप च्या सोलर पॅनलचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून वादळी वाऱ्यामुळे सोलार पॅनलचा अक्षरशः चुराडा झाला.

मटकराळा येथील भागवत बाबुराव गरुड, रोहिदास मारोतराव गरुड, शालिक ज्ञानोबा गरुड, बाबाराव बालाजी गरुड व सरस्वती भागवतराव गरुड यांच्या शेतामध्ये असलेल्या सोलार पंपचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून तक्रार करूनही सोलार पंप कंपनीकडून कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत झालेल्या नुकसानीचे महसूल विभागाने तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्याकडून होत आहे.

# जिंतूर तालुक्यात अवैध रेती वाहतुकीवर पोलिसांचा मोठा दणका वाळू माफी यांची मुजोरी पोलीस पथकावर जीव घेणे हल्ला

## चार कारवायांत ५७ लाखांहून अधिकांचा मुद्देमाल जप्त; शासकीय पथकावर हल्ल्याचाही गुन्हा

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर तालुक्यात अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरोधात पोलिस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या विशेष पथकाने शनीवारी (दि.२३) दिवसभरात धडक कारवाया करत चार स्वतंत्र गुन्हे दाखल केले. या कारवायांमध्ये टिप्पर, हायवा, टेम्पो, बोलेरो व दुचाकीसह तब्बल ५७ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यापैकी एका प्रकरणात पोलिसांच्या कारवाईत अडथळा आणत शासकीय पथकावर वाहन घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिली कारवाई सावळी येथील बसस्थानक परिसरात दुपारी साडेदोनच्या सुमारास करण्यात आली. पोलिस हवालदार सय्यद इरशाद अली यांच्या फिर्यादीवरून इरफान गफुर शेख (रा. मिस्कीन प्लॉट, जिंतूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीकडून अडीच ब्रास रेतीसह ७ लाख १५ हजार रुपयांचा टिप्पर जप्त करण्यात आला. दुसरी कारवाई इटोली-घेवडा रस्त्यावर करण्यात आली. या प्रकरणात चालक शेख जहीर शेख जमीर (रा. जमजम कॉलनी, जिंतूर) व वाहन मालक अक्षय शिवानंद थिटे (रा. धोबी गल्ली, जिंतूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दीड ब्रास रेतीसह ५ लाख १० हजार रुपयांचा टेम्पो जप्त केला. तिसऱ्या कारवाईत डोंगरतळा येथील कमळजाई मंदिर परिसरात अशोक संतोष वाकळे (रा. बामणी बुद्रुक) याच्याकडून दोन ब्रास रेतीसह २५ लाख १० हजार रुपयांचा हायवा टिप्पर जप्त करण्यात आला. दरम्यान, भोगाव देवी शिवारात भोगाव-इटोली रस्त्यावर पोलिसांच्या विशेष पथकाने रेती वाहतूक करणाऱ्या आयशर हायवावर कारवाई करण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याची घटना घडली. या प्रकरणी शिवराज गंगाधर हाळदे, सय्यद रहिम सय्यद बाबू, सोमनाथ वरणकर, चंद्रकांत सुर्यवंशी, अजिंक्य जगताप व इंद्रजित देशमुख यांच्याविरुद्ध विविध गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपींनी गैरकायदेशीर जमाव करून कारवाईत अडथळा आणला तसेच इनोव्हा कार



पोलिसांच्या अंगावर घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. यावेळी काही आरोपी पसार झाले असून आरोपी क्रमांक १ व ३ हे दुचाकीवरून पडून जखमी झाल्याची माहिती आहे. या कारवाईत २० लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सर्व गुन्हे भा.न्या. संहिता, पर्यावरण संरक्षण अधिनियम व सार्वजनिक संपत्ती नुकसान अधिनियमांतर्गत दाखल करण्यात आले असून परभणी पोलिस अधीक्षक यांच्या विशेष पथकात पि एस आय संदीप शिंदे,पि एस आय अर्जुन टरके,पोलीस अंमलदार - वाघमारे, चुडावकर, असलम शेख, सय्यद इर्शाद, ताटी कोंडलवार, वाहुळे आदींनी कारवाई केली असून पुढील तपास सपोनि चव्हाण करीत आहेत.

## अग्रलेख...

# हा पराभव जिव्हारी लागायला हवा...

गेल्या काही दशकांत शिक्षण क्षेत्रात अत्यंत धोकादायक असा प्रवाह वाढताना दिसतो आहे आणि त्याचे नाव ठेवले गेले आहे- डमी कॉलेज संस्कृती. विद्यार्थ्याने नावाला कुठल्या तरी महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा, पण प्रत्यक्षात कॉलेजमध्ये जायचेच नाही. वर्षभर खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये बसायचे आणि कॉलेज केवळ उपस्थिती, अंतर्गत गुण आणि बोर्ड किंवा विद्यापीठाच्या प्रक्रियांसाठी वापरायचे. अनेक शहरांत ही गोष्ट इतकी सामान्य झाली आहे की जे काही सुरू आहे ते चुकीचे आहे, असे कुणालाच वाटत नाही. या स्थितीमुळे शिक्षणाचा आत्माच हरवत चालला आहे. मेडिकल आणि इंजिनीअरिंग प्रवेशाच्या वाढत्या शर्यतीमुळे खाजगी क्लासेसचे जाळे प्रचंड वाढले. सुरुवातीला हे क्लासेस विद्यार्थ्यांना अभ्यासात मदत करणारे आणि स्पर्धेसाठी तयार करणारे माध्यम होते. हळूहळू त्यांनी शिक्षण व्यवस्थेच्या मुख्य प्रवाहाची जागा घेतली. आता बहुसंख्य पालकांचे आणि विद्यार्थ्यांचे मत असे झाले आहे की, शाळा आणि महाविद्यालये या केवळ औपचारिकता आहेत. खरे शिक्षण कोचिंग क्लासेसमध्येच मिळते. अनेक महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची बाके रिकामी दिसतात. शहरांमध्ये तर महाविद्यालये आणि त्यातही अकरावी-बारावीचे वर्ग अत्यंत भकास दिसतात. परीक्षेच्या वेळा वगळता प्रयोगशाळा रिकाम्या असतात. ग्रंथालयात औदासीन्य असते. कोचिंग क्लासेसमध्ये मात्र गर्दी असते. भल्या सकाळपासून रात्रीपर्यंत बॅचेस चालू असतात. या संपूर्ण प्रक्रियेत व्यक्तिमत्त्व विकास, वैचारिक जडणघडण, सामाजिक जाणीव या गोष्टी मागे पडतात.

डमी कॉलेज संस्कृती फोफावण्यामागे आर्थिक आणि संस्थात्मक साटेलोटे आहेच. उघड गुपित असे की, अनेक खाजगी क्लासेस आणि महाविद्यालयांमध्ये अनौपचारिक करार असतात. विद्यार्थी कॉलेजला आला नाही तरी त्याची उपस्थिती लावली जाते, अंतर्गत गुण दिले जातात. काही ठिकाणी तर पालकांना स्पष्ट सांगितले जाते की- ''कॉलेजची चिंता करू नका...आम्ही पाहून घेतो...'' हे सारे उघडपणे सुरू असते. त्यामुळे शिक्षण विभागाला त्याची माहिती नसते असे म्हणताच येत नाही. परिणाम असा होतो की, मोठा पगार घेणारे शाळा किंवा महाविद्यालयांचे शिक्षक शिकवायला येतात, पण विद्यार्थीच नसतात. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील जिवंत संवाद आता होत नाही. चर्चासत्रे, वादविवाद, सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थी संघटना हे सारे जणू चुकीचे होते आणि आता जे सुरू आहे तेच योग्य आहे, असे वाटण्यासारखी परिस्थिती आहे. खरे तर शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांचे सामाजीकरण होते. वेगवेगळ्या आर्थिक, सामाजिक, भाषक पृष्ठभूमीचे विद्यार्थी एकत्र येतात. एकमेकांची मते समजून घेतात. नेतृत्व विकसित होते. अनेकांना आयुष्यभराचे मित्र तेथे मिळतात. काहींना स्वतःमधील सुप्त गुणांचा आविष्कार होतो. डमी कॉलेज संस्कृतीमुळे विद्यार्थ्यांचे हे संपूर्ण सामाजिक जगच संकुचित झालेले आहे. एक वर्ग संपला की लगेच दुसरी बॅच सुरू होते. शिक्षण कमी आणि उत्पादन प्रक्रिया अधिक. विद्यार्थ्यांचे शारीरिक, मानसिक आरोग्य राहिले बाजूला. पुढे येते ते निकालांचे बाजारछाप प्रदर्शन. टॉपर विद्यार्थ्यांचे फोटो, मोठे होर्डिंग्ज, जाहिराती इत्यादी. हजारो विद्यार्थ्यांपैकी मोजकी यशस्वी उदाहरणे पुढे करून उर्वरित विद्यार्थ्यांवर प्रचंड मानसिक दबाव तयार केला जातो. अशा जाहिराती पाहून पालकांनाही वाटते की आपल्या मुलाने या शर्यतीत राहिलेच पाहिजे. त्यातून कुटुंबात ताण निर्माण होतो. शिक्षक पूर्वी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच, शिक्षक मंडळी त्यांच्या स्वभावाकडे, अडचणींकडे, मानसिक स्थितीकडे लक्ष देत असत. आता हा व्यवहार शुल्कापुरता मर्यादित झाला आहे. क्लासेस फी घेतात, टेस्ट घेतात आणि निकाल दाखवतात. पालकांना समाधान वाटते की मुलगा ''योग्य ट्रॅकवर'' आहे. पण तो खरोखर आनंदी आहे का, त्याला काय समजते आहे, त्याचा वैचारिक विकास होतो आहे का, असे सारे प्रश्न कुणालाच पडत नाहीत. अशा परिस्थितीत महाराष्ट्राचे शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणतात त्याप्रमाणे सर्व महाविद्यालयांमध्ये बायोमेट्रिक उपस्थिती सक्तीची करणे आवश्यक आहे यात वाद नाही. विद्यार्थी प्रत्यक्ष कॉलेजमध्ये येतो की नाही, याची डिजिटल नोंद असली पाहिजे आणि पुरेशी उपस्थिती नसल्यास परीक्षेला बसण्याची परवानगी दिली जाऊ नये. उपस्थितीचे नियम केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष अंमलात आले पाहिजेत. मात्र, केवळ तांत्रिक उपायांनी हा प्रश्न सुटणार नाही. शिक्षण खात्यातील भ्रष्टाचार हे या समस्येचे महत्त्वाचे कारण आहे. संस्थांच्या व शिक्षकांच्या मान्यतांमध्ये, नियुक्त्यांमध्ये आणि आर्थिक प्रक्रियांमध्ये भ्रष्टाचाराच्या तक्रारी सतत होत असतात. शालार्थ घोटाळ्याचे मुद्दे अजूनही चर्चेत आहेत. 'नीट'चा पेपर अशाच साट्यालोट्यातून फुटला हेही वास्तव. यात सुधारणा करायची असेल तर शैक्षणिक यंत्रणेचे प्रशासन पारदर्शक करावे लागेल. कोचिंग क्लासेसना नियंत्रणात आणावे लागेल आणि महाविद्यालयांना जबाबदार धरावे लागेल. डमी कॉलेज संस्कृतीचा सर्वांत मोठा तोटा माणूस घडण्याच्या प्रक्रियेत होत आहे. आपण आता सुधारलो नाही तर पुढील काही वर्षांत आपल्याकडे सामाजिक समज अत्यल्प असलेली पिढी तयार होईल. शिक्षणाची चर्चा झाली की लगेच गुण, रँक, पर्सेंटाईल, कट-ऑफ, सिलेक्शन या गोष्टी सर्वांच्या डोळ्यासमोर येतात. पालकांपासून संस्थांपर्यंत सर्वांचे लक्ष केवळ निकालांवर केंद्रित झाले आहे. कोचिंग क्लासेसचे ध्येयच मर्यादित असते. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त गुण मिळवून देणे एवढेच त्यांचे काम. त्यामुळे तेथे शिकवण्याची पद्धतही तशीच असते. वेग, तंत्र, शॉर्टकट, ट्रिक्स, प्रश्नांचा पॅटर्न, वेळ व्यवस्थापन या गोष्टींवर भर असतो. पण, ही तांत्रिक बाजू म्हणजे शिक्षणाचा केवळ एक भाग आहे, संपूर्ण शिक्षण नव्हे. शाळा किंवा महाविद्यालयीन शिक्षणाचा गाभा वेगळा असतो. वर्गात एखाद्या मुद्यावर चर्चा होते, विद्यार्थी त्यात सहभागी होतात, वेगवेगळे दृष्टिकोन समोर येतात. ही प्रक्रिया व्यक्तिमत्त्व घडवणारी असते. विद्यार्थी विचार करायला शिकतो. समाजात मतभेद असतात, विविधता असते, अनेकदा संघर्षही असतो हे त्याला महाविद्यालयाच्या वर्गात समजते. डमी कॉलेज संस्कृतीमुळे विद्यार्थ्यांचे हे नैसर्गिक सामाजिक शिक्षण संपत चालले आहे. सकाळपासून रात्रीपर्यंत कोचिंग क्लासेसमध्ये बसणारा विद्यार्थी फक्त स्पर्धात्मक जगात वावरतो. त्याच्या आयुष्याचे ध्येय रँक हेच बनते. तो सतत तुलना, स्पर्धा आणि दडपण यांच्या वातावरणात जगतो. याउलट, महाविद्यालयीन वातावरण विद्यार्थ्याला समाजाची ओळख करून देते. ग्रामीण भागातून आलेला विद्यार्थी शहरातील वास्तव पाहतो. आर्थिकदृष्ट्या सक्षम मुलांना संघर्ष करणाऱ्या विद्यार्थ्यांचे आयुष्य समजते. वेगवेगळे समुदाय, भाषा, विचारसरणी, संस्कृती यांचा परिचय होतो. काही जण पहिल्यांदा सार्वजनिक मंचावर बोलतात. काहींना नाटक, साहित्य, संगीत, राजकारण, सामाजिक कार्य यांची आवड तेथे गवसते. अनेकांना स्वतःची ओळखच कॉलेजमध्ये मिळते. कोचिंग क्लासेस यातले काहीही देऊ शकत नाहीत. कारण त्यांची रचना परिपक्व माणूस घडवण्यासाठी नव्हे जास्तीचे गुण देण्यासाठीच असते. कॉलेजमधील निवांत चर्चा, ग्रंथालयात बसून वाचन, मित्रांशी मतभेद-चर्चा, शिक्षकांशी संवाद या गोष्टी आता वेळ वाया घालविणाऱ्या मानल्या जाऊ लागल्या आहेत. प्रत्येक मिनिटाचा आर्थिक आणि स्पर्धात्मक हिशेब लावला जातो. ही मानसिकता धोकादायक आहे. शेवटी समाजाला फक्त भरपूर गुण घेऊन बाहेर पडणारे युवक नको असतात. समाजाला विचार करणारे, प्रश्न विचारणारे, संवेदनशील आणि सामाजिक भान असलेले नागरिक लागतात. अशी माणसे कोचिंग क्लासेसमध्ये तयार होत नाहीत. त्यासाठी जिवंत वातावरण असलेली महाविद्यालयेच हवीत. या विषयाकडे सर्वांचे दुर्लक्ष झाल्यामुळे आता महाविद्यालयांची जागा कोचिंग क्लासेसने घेतलेली आहे. महाविद्यालये फक्त नावापुरती उरली आहेत. हा संपूर्ण शैक्षणिक व्यवस्थेचा पराभव आहे. हा पराभव सर्वांच्या जिव्हारी लागला पाहिजे. आपली शिक्षण व्यवस्था संचालित करणाऱ्यांच्या जिव्हारी तो अद्याप लागला नसेल तर शिक्षणाचा गाडा लवकरच चिखलात रुतेल हे सांगण्यासाठी भविष्यवेत्ता नको.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# चिनी गुलाब आणि रशियन काटे!

व्हाईट हाऊसच्या दालनात आता चिनी गुलाब फुलणार आणि सोबत रशियन काटेही असणार! अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे राष्ट्रपती ब्लादिमिर पुतिन यांच्या एका मागोमाग झालेल्या चीन दौऱ्यांचे हे एकमेव फलित मानले जाते.

राष्ट्रपती ट्रम्प यांनी अगदी चुकीच्या वेळी चीनला भेट देत चीनला एक जागतिक 'महासत्ता' म्हणून मान्यता दिली. १९९० च्या दशकात सोवियत नेते मिखाईल गोर्बाचोव्ह यांनी आपल्याच देशाचे विखंडन करीत, अमेरिकेला जगाची एकमेव महासत्ता बनविले होते आणि ३६ वर्षांनंतर अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्याच देशाचे खच्चीकरण करीत एकप्रकारे चीनला महासत्ता घोषित केले. आता जगात पुन्हा दोन महासत्ता स्थापित झाल्या आहेत. एक अमेरिका आणि दुसरी चीन!

**आण्विक सर्वोच्चता** : जगातील ९ देशांजवळ आण्विक शक्ती आहेत. यातील उत्तर कोरिया, पाकिस्तान, रशिया हे तीन आण्विक शक्ती असलेले देश चीनच्या बाजूने आहेत तर ब्रिटन, फ्रान्स, भारत तटस्थ आहेत आणि फक्त इस्रायलच काय तो अमेरिकेच्या बाजूने आहे. इराणने आण्विक शक्ती प्राप्त केल्यास आणखी एक आण्विक देश चीनच्या गोटात सामील झालेला असेल. म्हणजे जगातील सर्वांत मोठी आण्विक शक्ती चीनजवळ असेल.

**वेळच चुकली** : राष्ट्रपती ट्रम्प यांची चीन दौऱ्याची वेळ साफ चुकली. इराणने मध्यपूर्वेतील अमेरिकेची लष्करी तळे बेचिराख केल्याची छायाचित्रे साऱ्या जगात प्रसारित होत आहेत. अमेरिकन प्रसार माध्यमांनीच ती सर्वप्रथम दाखविली. काही लष्करी तळे तर एवढी निकामी झाली आहेत की त्यांचा वापर थांबविण्यात आला आहे. आजवर अभेद्य मानल्या जाणाऱ्या एफ-३५ या लढाऊ विमानासही इराणने लक्ष्य करण्यात यश मिळविले. अमेरिकेच्या मित्र देशांना- कुवैत, सौदी अरेबिया, बहरीन, संयुक्त अरब अमिरात, कतार- यांनाही इराणने जायबंदी केले. एका लहान देशाने अमेरिकेसारख्या महासत्तेस जेरीस आणले असताना, ट्रम्प यांनी चीनच्या दौऱ्यावर जावे यासारखा आत्मघातकी निर्णय नव्हता.

**सल्ला झुगारला** : राष्ट्रपती ट्रम्प यांनी इराण युद्धाचे कारण सांगून आपला चीन दौरा स्थगित ठेवावा असा सल्ला त्यांना देण्यात आला होता. उपराष्ट्रपती व्हान्स व परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो या दोघांनीही असा सल्ला दिला होता. पण, ट्रम्प कुणाचेही ऐकण्याच्या मन:स्थितीत नसल्याने त्यांनी आपल्याच सहकाऱ्यांचा सल्ला ऐकण्याचा प्रश्नच नव्हता. उलट चीनने युद्धबंदीसाठी इराणवर दबाव टाकावा यासाठी आपल्याला या दौऱ्यात प्रयत्न करता येतील असा ट्रम्प यांचा युक्तिवाद होता. इराण हा चीनचा जिवलग साथीदार, व्यापाराचा भागीदार. आपल्या भागीदारावर आणि अमेरिकेच्या कट्टर शत्रूवर चीन कसा दबाव टाकणार? चीनने अमेरिका-इराण युद्धापासून स्वत:ला दूर ठेवण्याचा निर्णय घेतला. मात्र, मागून इराणला सर्वप्रकारचे लष्करी तंत्रज्ञानही तो पुरवीत आहे.



**गुलाबाचे बी** : राष्ट्रपती ट्रम्प यांनी आपल्या चीन दौऱ्यात काय मिळविले असा प्रश्न विचारला जात आहे. बोईंगसाठी २०० विमानांची ऑर्डर, बीन्सचा पुरवठा यासारख्या बाबी ट्रम्प सांगत असले तरी त्यांच्या पदरी फक्त गुलाबाचे बी पडले आहे, जे चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिन पिंग यांनी अमेरिकेला देऊ केले आहे. राष्ट्रपती ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमधील ओव्हल कार्यालयाचा काही भाग जमीनदोस्त केला असून त्याठिकाणी ते अत्याधुनिक सभागृह बांधणार आहेत. यासाठी तेथील गुलाबाच्या बगीच्याचाही बळी देण्यात आला. तेथे ट्रम्प हे बी लावणार आहेत. म्हणजे व्हाईट हाऊसच्या प्रांगणात चिनी गुलाब फुललेले दिसतील. मात्र, सोबत रशियाचे काटेही असतील. ट्रम्प यांच्या पाठोपाठ चीनमध्ये जाऊन रशियाचे राष्ट्रपती पुतिन यांनी अमेरिकेच्या विरोधातील आपली मोर्चेबांधणी अधिक बळकट केली आहे.

**चीनने ठणकावले** : राष्ट्रपती ट्रम्प यांच्या दौऱ्याचे निमित्त साधून चीनने तैवानबाबत अमेरिकेला ठणकाविले. तैवानबाबत अमेरिकेने कोणताही हस्तक्षेप करू नये अशा करड्या शब्दात चिनी राष्ट्रपती जिन पिंग बोलले. यावर ट्रम्प काहीच बोलले नाहीत. अखेर तैवानबाबत अमेरिकेची भूमिका स्पष्ट करण्याची जबाबदारी की कामगिरी परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांच्यावर येऊन पडली. रुबियो यांनी परखड शब्दात चीनला सुनावले. तैवानबाबत अमेरिकेच्या भूमिकेत कोणताही बदल झालेला नाही आणि कोणत्याही देशाने बळजबरीने तैवानबाबत निर्णय घेऊ नये, असे रुबियो यांनी स्पष्ट केले.

**रुबियोंचे नामकरण** : मार्को रुबियो हे चीनविरोधी भूमिका घेणारे नेते म्हणून ओळखले जातात. मागील काही वर्षांत त्यांनी चीनच्या विरोधात सातत्याने भूमिका घेतली आहे. चीनने त्याची दखल घेत रुबियो यांच्या चीन प्रवेशावर प्रतिबंध घातला होता. हाँगकाँगबाबत त्यांनी चीनच्या धोरणांचा जोरदार विरोध केला होता. त्याचा परिणाम म्हणजे रुबियो यांना चीनमध्ये प्रवेश नव्हता. पण, आता ते परराष्ट्र मंत्री म्हणून राष्ट्रपती ट्रम्प यांच्यासोबत चीनला येणार असल्याने, त्यांचा चीन प्रवेश रोखणे शक्य नव्हते. यासाठी चीनने नवी युक्ती शोधून काढली. त्यांनी रुबियो यांचे नावच बदलले. यासाठी चिनी आद्याक्षरांचा फायदा उललण्यात आला आणि रुबियो यांचे नामकरण मार्को लू असे करण्यात आले. म्हणजे राष्ट्रपती ट्रम्प यांच्यासोबत मार्को रुबियो यांच्याऐवजी मार्को लू गेले होते अशी नोंद चिनी दस्तावेजात करण्यात आली आहे.

**भारताची भूमिका** : भारत या साऱ्या घटनाक्रमाकडे शांतपणे पाहत आहे. चीन व अमेरिका या दोन्ही देशांशी भारताचे चांगले संबंध आहेत. इराण आणि इस्रायलसोबतही भारताचे जवळचे संबंध आहेत. भारताने या युद्धात मध्यस्थी करावी असा आग्रह इराणतर्फे केला जात असला तरी पाकिस्तान यात मध्यस्थी करीत असल्याने भारताने यात न पडण्याचा निर्णय घेतला व तो योग्य मानला जातो.

**स्थिती गंभीर** : दरम्यान, इराण-अमेरिका युद्धात साऱ्या जगाची व भारताची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असल्याचे मानले जाते. इराणने होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी केली आहे. याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने इराणच्या बंदरांची नाकेबंदी केली आहे. या दोन नाकेबंदीत जगाच्या अर्थव्यवस्थेची नाकेबंदी होत आहे. आता तर फक्त पेट्रोलियम पदार्थांचाच तुटवडा जाणवत आहे. एकदा का भारतात पेरणीचा हंगाम सुरू झाला की रासायनिक खतांचा तुटवडा जाणवू लागेल व त्याचा परिणाम देशाच्या कृषी उत्पादनावर होणार आहे. ते झाल्यास अन्नधान्याचे एक अभूतपूर्व संकट देशात तयार होऊ शकते.

**रुपयाची घसरण** : २८ फेब्रवारी रोजी हे युद्ध सुरू झाल्यापासून रुपयाची सुरू झालेली घसरण अद्याप थांबलेली नाही. येणाऱ्या काही दिवसांत वा आठवड्यांत एका डॉलरसाठी १०० रुपये मोजावे लागतील. याचा दुसरा अर्थ युद्ध सुरू झाल्यानंतर डॉलरच्या तुलनेत रुपयाची १० टक्के घसरण झाली आहे. याचा मोठा अर्थ म्हणजे देशावरील विदेशी कर्ज १० टक्के वाढणार आहे. भारत सरकारसाठी हे एक मोठे आव्हान राहणार असून, ते हाताळण्याची तयारी सरकारने सुरू केली आहे. वाढती महागाई, बेरोजगारी, पेट्रोलियम पदार्थांचा सुरळीत पुरवठा व रासायनिक खतांची उपलब्धता अशा या चार प्रमुख आघाड्यांवर सरकारला काम करावे लागणार आहे.

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# सालंकृत कन्यादान कशाला?

आपल्या देशात जन्म, मरण, लग्न, सणवार अशा क्षणांना अतिशय महत्त्वाचे स्थान दिले जाते. या प्रत्येक क्षणाशी अर्थकारण निगडित आहे. त्यातही लग्न हा विषय अतिशय जिव्हाळ्याचा असल्याने त्याच्यासोबतची आर्थिक गणितंही बरीच मोठी आहेत. घरात मुलगी जन्माला आल्यापासून तिच्या लग्नाचा विषय घरच्यांमध्ये अक्षरशः भिनलेला असतो. मुलीचे शिक्षण नीट झाले पाहिजे, हा विचार आता कुठे समाजात रुजतोय. पण, त्याच्यासोबत लग्नाचा विचार पिच्छा पुरवतोच. मग लग्नासाठी आई-वडिलांकडून सोन्याचा दागिना दिला पाहिजे, ही अघोषित परंपरा पिढ्यान्‌पिढ्या सुरू आहे. अर्थात, दागिना हा एखादा दागिना नसतो. लग्नाची बोलणी करणारे मुलाकडील 'चतुर' लोक याला 'सालंकृत कन्यादान' म्हणतात. आम्हाला काही नको, तुम्ही मुलीचे सालंकृत कन्यादान करणारच ना, असे वाक्य ते हमखास फेकून मारतात. मग मुलीकडील बोलणी करणारे म्हणतात, हो-हो, आम्ही यथाशक्ती सालंकृत कन्यादान करूच. या सालंकृत कन्यादान शब्दाचा जेव्हा आढावा घेतला तेव्हा लक्षात आले की, त्यात डोक्यापासून पायापर्यंतच्या सर्व अलंकारांचा समावेश होतो. म्हणजे वडिलांकडून मुलीला इतके सोने मिळणारच आहे. यासाठी मग त्या मुलीच्या वडिलांची काय ससेहोलपट होईल, याची कोणाला तमा नसते. पण, आता काळ बदलला आहे, असे आपण म्हणत असू तर अशा परंपरांमध्येही बदल व्हायलाच हवा. विशेष म्हणजे, मुलाकडच्या मंडळींनी आपल्या होणाऱ्या सुनेला मंगळसूत्रापलीकडे फार काही देणे अपेक्षित नसते. तरीही आजकाल बरेच काही दिले जाते. म्हणजे दोन्ही पक्षांकडून नवरीवर सोन्याची नुसती लयलूट असते. असो. पण, मुळात लग्नात सालंकृत कन्यादान केले नाही तर काय बिघडणार आहे?



यावर काही 'जाणते' लोक तर्क सांगतात की, सोने अडल्या-नडल्या वेळी कामी येणार. म्हणून सोने खरेदी करण्याची परंपरा आपल्या देशात आहे. मुलीच्या भविष्यातील अडल्या-नडल्या वेळेसाठी सोनेच दिले पाहिजे, ही सक्ती कशाला? तुमच्याकडे पैसा असेल तर तिला एफडी करून द्या. आजकाल गुंतवणुकीच्या हजारो योजना आहेत. त्यातील एखाद्या सरकारी बँकेतील उत्तम योजनेत तिच्या नावाने पैसे गुंतवा. तो पैसा तिला यथावकाश सोपवा आणि तुला जेव्हा खऱ्या अर्थाने गरज पडेल तेव्हाच तो वापर हे सांगून ठेवा. तिच्या मिळकतीतून तिला बचत करायला शिकवा. ही सवय तिच्यावर वाईट वेळ येऊच देणार नाही. त्यासाठीही आजकाल एसआयपी आणि राष्ट्रीयीकृत बँकांच्या पीपीएफसारख्या असंख्य योजना आहेत. आजकाल तर बहुतांश सरकारेदेखील मुलीच्या जन्मापासून तिच्यासाठी पैशाची तरतूद करून ठेवतात. पण, हा पैसा तिच्या लग्नासाठी म्हणून वापरण्यापेक्षा तिला पायावर उभे करण्यासाठी वापरला जावा. ती आत्मनिर्भर झाली तर तिला भविष्यकाळात सोन्याचीही कमतरता राहणार नाही आणि सोने विकण्याचीही गरज पडणार नाही.

याचाच दुसरा विचार म्हणजे, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या वर्षभरात सोने खरेदी करू नका, असे आवाहन केले आहे. आपण नाहीच खरेदी केले सोने तर काय बिघडणार आहे? काहीही बिघडणार नाही. आपल्या देशाच्या भल्यासाठी त्यांनी केलेले हे आवाहन आपण सहकार्य केले तरच यशस्वी ठरणार आहे. कधीकाळी देशावर अशी वेळ आली होती जेव्हा तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी लोकांना एक वेळेच्या जेवणाचा त्याग करा, असे आवाहन केले होते. जेव्हा देशाचे नेतृत्व आपल्या नागरिकांना कळकळीने काही गोष्टी सांगत असेल तेव्हा त्याचा सकारात्मक विचार व्हायला हवा. आज जागतिक स्तरावर असणारे वातावरण संघर्ष आणि तणावाचे आहे. अशा स्थितीत देशाची अर्थव्यवस्था सांभाळणे हे फार मोठे आव्हान सरकारसमोर आहे. म्हणून त्यांच्या वतीने या आव्हानाला पेलण्यासाठी आपण त्याचे 'आवाहन' अंगीकारणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी वाट्टेल त्या इच्छांना आणि अनिष्ट परंपरांना मुरड घालावी लागली तरीही बेहत्तर, पण देशहित सर्वोपरी असावे. मुलीच्या लग्नात तिच्या अंगावर सोन्याचे दागिने नसतील तर बापाला वाईट वाटेल. पण, पुढील काळाच्या दृष्टीने तर समाजाने लग्न व्यवस्थेतून सोन्याच्या दागिन्यांनाच फाटा दिला तर तिच्या जन्मासोबतच तिच्या लग्नाचा खर्च दिसणार नाही आणि पर्यायाने मुलीच्या जन्माचा आनंद द्विगुणित होईल.

७७५५९३८८२२

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# काटकसरीचे राजकारण

जागतिक संकटाच्या पृष्ठभूमीवर पंतप्रधानांचा विदेश दौरा उलटसुलट चर्चांचा ठरलेला आहे. परंतु त्याची गरज काय होती, सद्य:स्थितीत त्याचे महत्त्व काय आहे आणि भारतासाठी त्याचे परिणाम काय आहेत हे जाणून घेणे देशवासीयांच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहे.

अलिकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना पेट्रोल-डिझेलची बचत करण्याचे, अनावश्यक परदेश प्रवास टाळण्याचे आणि काही काळ सोने खरेदी न करण्याचे आवाहन केले. पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या संघर्षामुळे जागतिक तेलबाजार अस्थिर झाला आहे आणि त्याचा परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होत आहे. भारत हा जगातील मोठ्या तेल आयातदार देशांपैकी एक असल्यामुळे वाढत्या कच्च्या तेलाच्या किमती, परकीय चलन साठ्यावर येणारा ताण आणि वाढती आयात ही सरकारसाठी चिंता बनली आहे. त्यासाठी पंतप्रधानांनी काटकसरीचे आवाहन भारतीयांना केलेले आहे. १९६५ च्या युद्धाच्या वेळेला त्यावेळेसचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी सुद्धा एक वेळ उपवास करण्याचे आवाहन केले होते. परंतु त्यावेळेला याला राजकीय चष्म्यातून पाहिले गेले नव्हते. लालबहादूर शास्त्रींना मानणाऱ्या लोकांना अंधभक्त म्हटले जात नव्हते. मोदींना मानणारे मात्र अंधभक्त ठरतात.

या पृष्ठभूमीवर केंद्र सरकारमधील अनेक मंत्र्यांनी आपले विदेश दौरे कमी केले किंवा रद्द केले. महाराष्ट्र सरकारमधील मंत्र्यांनी सुद्धा आपले विदेश दौरे रद्द केले. त्यामुळे विरोधकांकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले की, जेव्हा देशवासीयांना काटकसरीचा सल्ला दिला जात आहे, तेव्हा पंतप्रधानांनी स्वतः विदेश दौरा का काढला? परंतु या प्रश्नाचे उत्तर भारताच्या परराष्ट्र धोरणात आणि जागतिक राजकारणातील भारताच्या भूमिकेत दडलेले आहे. जगावर जेव्हा युद्धाचे ढग दाटलेले आहेत अशा परिस्थितीत शत्रू मित्रांच्या कल्पना बदलत असतात. आपल्याला चांगल्या पुरवठादारांचा शोध आहे तसाच जगातील अनेक देशांना चांगल्या ग्राहक राष्ट्रांचा सुद्धा शोध असतोच. युद्ध हे जगाकरिता संकट असले तरी त्यातून काही संधी सुद्धा निर्माण होऊ शकतात हे समजण्यासाठी राजनीतिक कूटबुद्धीची आवश्यकता असते. समाज माध्यमांवर तलवार चालविणारे आणि व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी हे समजू शकत नाहीत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या महत्त्वपूर्ण विदेश दौऱ्यामध्ये संयुक्त अरब अमिरात, नेदरलॅण्ड्स, स्वीडन, नॉर्वे आणि इटली या देशांचा समावेश होता. या सर्व देशांशी भारताचे आर्थिक, ऊर्जा, संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील संबंध अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. दौऱ्याची सुरुवात संयुक्त अरब अमिरातपासून झाली. पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थिती लक्षात घेता हा दौरा अत्यंत महत्त्वाचा मानला गेला. येथे पंतप्रधानांनी ऊर्जा सुरक्षा, दीर्घकालीन गॅस पुरवठा, गुंतवणूक आणि सागरी सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण चर्चा केली. भारताच्या ऊर्जा गरजांसाठी संयुक्त अरब अमिरात हा एक महत्त्वाचा भागीदार मानला जातो. जागतिक तेल संकटाच्या काळात ऊर्जा पुरवठा स्थिर ठेवणे भारतासाठी अत्यंत आवश्यक आहे. यानंतर पंतप्रधानांनी नेदरलॅण्ड्सला भेट दिली. या भेटीदरम्यान भारत आणि नेदरलॅण्ड्स यांनी 'धोरणात्मक भागीदारी'ची घोषणा केली. सेमीकंडक्टर, हरित हायड्रोजन, तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा क्षेत्रांमध्ये १७ करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. आजच्या डिजिटल आणि तंत्रज्ञानावर आधारित जगात सेमीकंडक्टरचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. भारताला इलेक्ट्रॉनिक्स आणि तंत्रज्ञान क्षेत्रात स्वावलंबी बनवण्यासाठी हे सहकार्य महत्त्वपूर्ण ठरू शकते.

स्वीडन दौऱ्यामध्ये दोन्ही देशांनी धोरणात्मक भागीदारी अधिक बळकट करण्यावर भर दिला. हरित ऊर्जा, संरक्षण उत्पादन, नवतंत्रज्ञान आणि उद्योग क्षेत्रात सहकार्य वाढवण्याचे ठरले. स्वीडन हा नवनवीन कल्पना आणि शाश्वत तंत्रज्ञानाकरिता जगभरात ओळखला जाणारा देश आहे. त्यामुळे भारताच्या 'मेक इन इंडिया'आणि 'हरित' धोरणांना या भागीदारीमुळे चालना मिळू शकते.

नॉर्वेमध्ये पंतप्रधानांनी तिसऱ्या भारत-नॉर्डिक परिषदेत सहभाग घेतला. विशेष म्हणजे मागील ४३ वर्षांनंतर भारतीय पंतप्रधानांनी नॉर्वेला भेट दिली. या परिषदेमध्ये हवामान बदल, हरित ऊर्जा, सागरी अर्थव्यवस्था, आर्क्टिक क्षेत्रातील सहकार्य आणि डिजिटल विकास यासारख्या विषयांवर चर्चा झाली. नॉर्डिक देश हे पर्यावरणपूरक विकास आणि उच्च जीवनमानासाठी ओळखले जातात. त्यामुळे भारतासाठी या देशांशी सहकार्य वाढवणे भविष्यात महत्त्वाचे ठरू शकते.

दौऱ्याच्या शेवटी पंतप्रधानांनी इटलीला भेट दिली. येथे इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्याशी उच्चस्तरीय चर्चा झाली. दोन्ही देशांनी संबंधांना 'विशेष धोरणात्मक भागीदारी'चा दर्जा दिला. संरक्षण, व्यापार, उत्पादन उद्योग, तंत्रज्ञान आणि भूमध्य समुद्र क्षेत्रातील सहकार्य यावर विशेष भर देण्यात आला. युरोपियन राष्ट्रांशी भारताचे वाढते संबंध जागतिक राजकारणात भारताची भूमिका अधिक मजबूत करत आहेत. पंतप्रधानांचा विदेश दौरा हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसतो. तो देशाच्या आर्थिक, सामरिक आणि राजनैतिक हितांशी जोडलेला असतो. विशेषतः युद्धसदृश परिस्थिती, तेलसंकट किंवा जागतिक आर्थिक अस्थिरता निर्माण झाल्यास राष्ट्रप्रमुखांचे प्रत्यक्ष संवाद अधिक महत्त्वाचे ठरतात. अशा वेळी आंतरराष्ट्रीय संबंध मजबूत ठेवणे, ऊर्जा पुरवठा सुरक्षित करणे, व्यापारसंबंध टिकवणे आणि भारताच्या हितांचे संरक्षण करणे ही मोठी जबाबदारी असते. याच कारणामुळे पंतप्रधानांचा विदेश दौरा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. भारताला ऊर्जा सुरक्षितता, खतांचा पुरवठा, संरक्षण सहकार्य आणि व्यापार यासाठी विविध देशांशी सतत संपर्क ठेवावा लागतो. आंतरराष्ट्रीय संकटाच्या काळात अनेक निर्णय केवळ दूरध्वनी किंवा ऑनलाईन बैठकीत होत नाहीत; त्यासाठी प्रत्यक्ष भेटी, विश्वासाचे वातावरण आणि उच्चस्तरीय चर्चा आवश्यक असतात.

पंतप्रधानांनी नागरिकांना केलेले आवाहन हे 'काटकसरीचे राजकारण' नसून 'राष्ट्रीय संसाधनांचे संरक्षण' या दृष्टीने असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. ऊर्जा सुरक्षिततेच्या दृष्टीने या दौऱ्याचे महत्त्व मोठे आहे. भारताने मागील काही वर्षांत रशिया, मध्यपूर्व आणि इतर देशांसोबत तेल व गॅस पुरवठ्याचे विविध पर्याय उभे केले आहेत. जागतिक संकटात भारताला पुरेसा पुरवठा मिळावा यासाठी उच्चस्तरीय चर्चा आवश्यक असतात. अशा दौऱ्यांमुळे भारताला दीर्घकालीन करार, कमी दरात पुरवठा किंवा नवीन गुंतवणूक संधी मिळू शकतात.एकंदरीत पाहता, पंतप्रधानांचा हा विदेश दौरा जागतिक संकटाच्या पृष्ठभूमीवर भारताच्या आर्थिक, सामरिक आणि ऊर्जा हितांचे संरक्षण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला आहे. नागरिकांसाठी काटकसर आणि सरकारसाठी सक्रिय परराष्ट्र हालचाली या दोन्ही गोष्टी एकाच वेळी चालू राहू शकतात, हेच या संपूर्ण घडामोडीतून स्पष्ट होते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### तीन तिघाडा काम बिघाडा आणि 'नीट'चा अजब योगायोग!

'तीन तिघाडा काम बिघाडा' ही मराठीतील जुनी म्हण आपण नेहमीच ऐकतो. एखाद्या कामात किंवा निर्णयात तिघे एकत्र आले की ते काम ठरवून बिघडणार, असा या शब्दांचा सरळ अर्थ. परंतु, नुकत्याच गाजलेल्या नीट परीक्षा पेपरफुटीच्या प्रकरणात या तीन आकड्याने आणि म्हणीने जो काही चमत्कार घडवला आहे, तो पाहिला की हा केवळ योगायोग नसून निसर्गाचाच काहीतरी अदृश्य न्याय असावा असे वाटू लागते. बातमीतील गांभीर्यामध्ये लपलेली ही एक अजब गंमत वाचकांसमोर आणण्याचा हा एक छोटासा प्रयत्न. लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या कष्टावर पाणी फेरून या महाभागांनी जो काम बिघाडा केला आहे, त्याचा धागा शेवटी या तीनच्या आकड्यावरच येऊन थांबला आहे.

डॉक्टर बनू पाहणाऱ्यांच्या या क्षेत्रात, भ्रष्टाचाऱ्यांनी मात्र अंकशास्त्राचा एक अजब पॅटर्न राबवला आहे की काय, असे खालील योगायोग पाहिल्यावर वाटते. नीट परीक्षेचे मूळ विषय तीन जीवशास्त्र, रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र! यामध्ये



सापडलेल्या आरोपींमधील प्रमुख तीन आरोपींचे प्रथम नाव तीन अक्षरी त्यातील साम्य. ज्या शैक्षणिक पॅटर्नचे नाव संपूर्ण देशात प्रसिद्ध आहे, त्यात ही तीन अक्षरे. पाल्यासाठी पेपर विकत घेणाऱ्या डॉक्टरचे आडनाव तीन अक्षरी. पेपरच्या घोळाचे भाषांतर करणारा महाभाग तीन अक्षरी. ज्या मुख्य आरोपीच्या क्लासचे नाव अख्ख्या महाराष्ट्रात गाजले, तेही तीन अक्षरी! अगदी राजस्थानमध्ये ज्या व्यक्तीने या घोटाळ्याची प्रथम तक्रार केली, त्याचे आडनाव ही तीन अक्षरी. नेहमी भ्रष्टाचार पकडण्यासाठी तपास यंत्रणांना जंगजंग पछाडावे लागते. परंतु इथे या तीनच्या आकड्यानेच स्वतःहून पोलिसांना आणि जनतेला सुगावा लावून दिला की काय, अशी शंका येते. संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचे तीनतेरा वाजवणारा हा खेळ शेवटी या तीनच्या चक्रातच अडकला असून, या त्रिकुटाचा पर्दाफाश करणारा निसर्गाचा हा न्याय खरोखरच अजब म्हणावा लागेल!

**अविनाश देशपांडे**/पुणे

### शासकीय कर्मचारी, वाढत्या सुविधा आणि रखडलेला विकास

देश प्रगत होत आहे, तंत्रज्ञान वाढत आहे, शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, सुविधा आणि सुरक्षितता सतत वाढत आहेत. वेतन आयोग, निवृत्तिवेतन, विविध भत्ते, सुट्ट्या, कार्यालयीन सुविधा, डिजिटल यंत्रणा या सर्व गोष्टी कर्मचाऱ्यांना अधिक सक्षम करण्यासाठी दिल्या जातात. परंतु, या वाढत्या सुविधांच्या तुलनेत विकासकामांचा वेग का वाढत नाही?

आज अनेक गावांमध्ये रस्ते अर्धवट आहेत, पाणी योजना कागदावरच आहेत, शासकीय कार्यालयांमध्ये सामान्य नागरिकांचे वेळेवर काम होत नाही, फाईल एका टेबलवरून दुसऱ्या टेबलवर फिरत राहते. नागरिक कर भरतो, शासन निधी देते, कर्मचारी सुविधा घेतात; पण विकासाची गती मात्र अनेकदा मंदच दिसते. सुविधा मिळणे चुकीचे नाही. प्रत्येक कर्मचाऱ्याला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. परंतु सुविधा जबाबदारी वाढवतात की फक्त अपेक्षा वाढवतात, हा खरा प्रश्न आहे. जेव्हा कार्यालयीन वेळेपेक्षा नियमांचे कारण पुढे केले जाते, तेव्हा सामान्य माणूस त्रस्त होतो. काही ठिकाणी 'कामापेक्षा प्रक्रिया' मोठी झाली आहे. वास्तविक पाहता, विकास कामात अडथळा केवळ निधीअभावी नसतो; तर निर्णय घेण्यातील विलंब, कागदी प्रक्रिया, जबाबदारी टाळण्याची मानसिकता आणि कार्यक्षमतेचा अभाव हीसुद्धा मोठी कारणे आहेत. अनेक प्रामाणिक अधिकारी उत्कृष्ट काम करतात, पण संपूर्ण व्यवस्थेची प्रतिमा काही निष्क्रियतेमुळे मलिन होते. आज गरज आहे ती सुविधा विरुद्ध सेवा या समतोलाची. सरकारी नोकरी ही केवळ सुरक्षितता नसून लोकसेवेची जबाबदारी आहे, ही भावना पुन्हा जागी करावी लागेल. विकासाचा वेग वाढवायचा असेल तर कार्यालयीन शिस्त, वेळेची किंमत, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व अनिवार्य करावे लागेल.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

### जनगणना की आर्थिक सर्व्हे

पूर्वी जनगणनेत केवळ घरातील सदस्यांची संख्या आणि वार्षिक उत्पन्न यासारख्या माहितीवर भर दिला जात असे. मात्र, २०२६ च्या जनगणनेसाठी तयार करण्यात आलेल्या प्रश्नावलीत अनेक बारीकसारीक आणि कौटुंबिक जीवनशैलीशी निगडित प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे.

उदा. घरात खोल्यांची संख्या किती आहे, कुटुंबात विवाहित जोडपी किती आहेत, मोबाईल डेटा वापरता की वायफाय असे निरनिराळे प्रश्न विचारले जात आहेत. जर जनगणना केली जात आहे तर हे प्रश्न का विचारले जात आहेत की जनगणनेच्या आडून आर्थिक सर्व्हे करत असून सरकारी योजना बंद करण्याचा मानस आहे का? काही कर्मचाऱ्यांकडे ओळखपत्र नसल्यामुळे त्यांनी घरोघरी जाऊन असे प्रश्न विचारल्यामुळे संशय निर्माण होत आहे. अशा वेळी प्रशासनाने खुलासा करणे आवश्यक आहे.

**माधव ताटके**/पुणे

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८

RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# भारतीय जनगणना 2027 : परळीत घरगणनेत सर्कल क्र. 34 अव्वल; प्रगणक टीमचा सत्कार





परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :

भारतीय जनगणना 2027 अंतर्गत पहिल्या टप्प्यातील घरगणनेचे काम नगरपरिषद परळी वैजनाथ येथे सुरू असून सर्कल क्र. 34 मधील पर्यवेक्षक व प्रगणकांच्या टीमने उल्लेखनीय कामगिरी करत संपूर्ण काम सर्वप्रथम पूर्ण केले आहे. या उत्कृष्ट कार्याबद्दल संबंधित टीमचा कार्यालयात सत्कार समारंभ आयोजित करून गौरव करण्यात आला. दि.16 मे ते 14 जून दरम्यान प्रगणकांना सहकार्य करावे तसेच राष्ट्रीय कर्तव्य म्हणून जनगणनेत सहभागी व्हा असे आवाहन मुख्याधिकारी यांनी केले आहे.

भारतीय जनगणना 2027 अंतर्गत पहिल्या टप्प्यातील घरगणनेचे काम नगरपरिषद परळी वैजनाथ येथे सुरू असून या टीममध्ये पर्यवेक्षक सरताज ताहेरखान तसेच फड संतोष, हैद्राबादे नितीन, नागरगोजे प्रवीण, शेख मसूद, 0203 पठाण फरहत बेगम व शेख मुस्ताक शेख पाशा यांचा समावेश होता. भारतीय जनगणना 2027 अंतर्गत पहिल्या टप्प्यातील घरगणनेचे काम यशस्वीरित्या व वेळेत पूर्ण केल्याबद्दल त्यांचा पुष्पहार घालून सन्मान करण्यात आला.

यावेळी मुख्याधिकारी पोपट निगळ, उपमुख्याधिकारी संतोष रोडे, जिल्हा जनगणना क्षेत्र प्रशिक्षक प्रा. शंकर कापसे, प्रा. अतुल दुबे, श्री. पंकज मधूकरराव दहातोंडे व श्री. वसीम अकबर शेख यांच्या उपस्थितीत टीमचे अभिनंदन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी टीमच्या कार्याचे कौतुक करत पुढील जनगणना प्रक्रियाही याच तत्परतेने व जबाबदारीने पूर्ण करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

परळी वैजनाथ शहरात जनगणना प्रक्रिया जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून प्रशासकीय तयारी पूर्ण करण्यात आली आहे. यासाठी विविध स्तरांवर प्रशिक्षण देण्यात आले असून 1 चार्ज अधिकारी, 1 अतिरिक्त चार्ज अधिकारी, 1 विभाग प्रमुख, 1 सहायक विभाग प्रमुख, 2 फिल्ड ट्रेनर, 35 पर्यवेक्षक व 208 प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भारतीय जनगणना 2027 साठी नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे तसेच नियुक्त प्रगणक व पर्यवेक्षकांना आवश्यक माहिती उपलब्ध करून देत राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन चार्ज अधिकारी तथा मुख्याधिकारी श्री. पोपट नानासाहेब निगळ यांनी केले आहे.

# प्रा पवन मुंडे यांच्याकडून प्रभाग 10 मधील विकासकांची पाहणी

## पावसाळ्यापूर्वी नप बांधकाम विभाग शहरातील सर्व प्रलंबित रस्ते व नाल्यांचे कामे पूर्णत्वाला नेणार



परळी प्रतिनिधी : पर्यावरण व तथा पशुसंवर्धन मंत्री मा ना पंकजाताई मुंडे व माजी मंत्री मा आ धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नगराध्यक्ष पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या नियोजनाखाली शहरात DPDC जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून सर्वत्रच परळी नगरपरिषदेच्या वतीने विविध कामे चालू असून येणाऱ्या पावसाळ्या अगोदर सर्वच नाल्या व रस्त्यांचे कामे नगरपरिषद बांधकाम विभाग परळी च्या वतीने पूर्ण करण्यात येतील असा विश्वास सभापती प्रा पवन मुंडे यांनी केला.

प्रभाग 10 मधील नाल्यांचे कामे चालू असून या नाल्यांची पाहणी करण्यात आली व लवकरात लवकर कामे पूर्ण करावेत आशा सूचना संबंधित कंत्राटदाराला देण्यात आल्या. या प्रसंगी त्या भागाचे नगरसेवक तथा भाजपा युवामोर्चा माजी जिल्हाध्यक्ष नीळकंठभाऊ चाटे, नगरसेवक लक्ष्मण मुरकुटे, नगरसेवक भीमराव डावरे,सम्राट गित्ते,दयाराम आघाव,नारायण गुट्टे,चैतन्य मुंडे,विकास पाळवदे ,सोमनाथ कांगणे कार्यकर्ते उपस्थित होते.

# महेबुबिया सोसायटीच्या नवीन कार्यकारी मंडळाची निवड

## शेख खाजा पुन्हा अध्यक्ष तर बहादुर भाई यांची सचिवपदी निवड



परळी प्रतिनिधी : परळी येथील नामवंत अल्पसंख्याक शिक्षण संस्था असलेल्या महेबुबिया सोसायटी, परळी वैजनाथ जिल्हा बीड (नोंदणी क्र. एफ १३१/बीड) या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २३ मे २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाली. संस्थेचे सदस्य सय्यद इतेशाम उर्फ सलीम भाई यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा पार पडली.

सभेमध्ये मागील सभेच्या इतिवृत्तास मंजुरी देण्यात आली तसेच सन २०२५-२६ च्या आर्थिक अहवालास मान्यता देण्यात आली. यावेळी सन २०२६ ते २०३१ या पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठी ११ सदस्यीय नवीन कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली. त्यानंतर दि. २४ मे २०२६ रोजी नव्याने निवड झालेल्या कार्यकारी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये शेख खाजा शेख महेताब यांची पुन्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली असून सय्यद इतेशाम उर्फ सलीम जमीन अली यांची उपाध्यक्षपदी निवड झाली. तसेच सय्यद हनीफ उर्फ बहादुर भाई सय्यद करीम यांची सचिवपदी, सय्यद इस्माईल करीम यांची सहसचिवपदी तर ताज खान अमीर खान यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

याशिवाय कार्यकारी मंडळाच्या सदस्यपदी सय्यद हुसेन करीम, सय्यद वाजेद कादर, मोहम्मद रफिक रज्जाक, मुसा खान गुलाब खान, झोबिया सय्यद इस्माईल आणि सय्यद यासीन हनीफ यांची बहुमताने तसेच एकमताने निवड करण्यात आली.

नवीन कार्यकारी मंडळाच्या निवडीनंतर संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे व सदस्यांचे विविध स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# केदारनाथाचे दर्शन घेत असतानाच वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकासाच्या 301 कोटीच्या आराखड्यास मंजूरी

## पंकजाताई मुंडे यांनी मानले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार



मुंबई दि. २२ -- चार धाम यात्रेच्या दरम्यान केदारनाथाचे दर्शन घेत असतानाच परळीच्या श्रीक्षेत्र वैद्यनाथ मंदिर तीर्थक्षेत्राचा ३०१ कोटीचा आराखडा मंजूर केल्याबद्दल राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज वर्षा निवासस्थानी जावून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत राज्यातील इतर देवस्थानाबरोबरच परळीच्या वैद्यनाथ ज्योतिर्लिंग मंदिर तीर्थक्षेत्र विकासाच्या ३०१ कोटी रूपयांचा आराखडा मंजूर केला. बैठकीच्या दरम्यान ना. पंकजाताई मुंडे चार धाम यात्रेला गेल्या असल्याने उपस्थित राहू शकल्या नव्हत्या पण त्यांनी केदारनाथाला मनोभावे केलेली प्रार्थना फळास आली. मागील सरकारमध्ये मंत्री असताना वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली होती. चार धाम यात्रेत केदारनाथाचे दर्शन घेत असताना इकडे त्याच दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र आराखड्यास मंजूरी दिली, हा योगायोगच म्हणावा लागेल. या आराखड्यातंर्गत परळीत मंदिर परिसरात मोठया प्रमाणात विकास कामे होणार असून शहराचे रूप पालटणार आहे.

मुख्यमंत्र्यांचे मानले आभार

ना. पंकजाताई मुंडे यांनी आज वर्षा निवासस्थानी जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आणि वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास मंजुरी दिल्याबद्दल केदारनाथाचा प्रसाद आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचे आभार मानले.

# ८१ लाख ७८ हजार रुपयांची अपहारीत रक्कम केली हस्तगत!

## (CMEGP) योजनेतील गैरव्यवहाराचा पर्दाफाश; आरोपींना बेड्या

**बीड** | मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सी.एम.ई.जी.पी.) योजनेच्या अंतर्गत कर्जावरील अनुदानाच्या रकमेमध्ये झालेल्या तब्बल २ कोटी ५१ लाख ५१ हजार ६९२ रुपयांच्या अपहाराचा बीड सायबर पोलिसांनी तांत्रिक पद्धतीने छडा लावला आहे. या अत्यंत क्लिष्ट आणि मोठ्या गुन्ह्याचा तपास करत पोलिसांनी आरोपींना अटक केली असून, अपहारीत रकमेपैकी ८१ लाख ७८ हजार २८९ रुपयांची रक्कम फ्रीज करून ती परत मिळवण्यात पोलिसांना मोठे यश आले आहे.

याबाबत मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, हा संपूर्ण गुन्हा मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या कर्ज मंजुरीच्या प्रक्रियेत खोटे दस्तऐवज आणि बनावट कागदपत्रे तयार करून करण्यात आला होता. आरोपींनी बँकेच्या अधिकृत पोर्टल लॉगिनचा गैरवापर करून इतक्या मोठ्या रकमेचा अपहार केला होता. या प्रकरणी उद्योग सहसंचालक विभागीय कार्यालय (छत्रपती संभाजीनगर) येथील शासकीय अधिकारी बाळासाहेब त्रिंबक यशवंत (वय ५४ वर्ष) यांच्या फिर्यादीवरून बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. १३९/२०२४ नुसार भादंवि कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४०९, ३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा (IT Act) कलम ६६(ड) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य आणि व्याप्ती लक्षात घेऊन हा तपास बीड सायबर पोलीस ठाण्याकडे सोपवण्यात आला होता. सायबर पोलिसांनी अत्यंत क्लिष्ट स्वरूपाच्या या गुन्ह्याचा तांत्रिक पद्धतीने तपास सुरू केला. गुन्ह्यातील डिजिटल पुरावे आणि बँक खात्यांचे व्यवहार तपासून पोलिसांनी अखेर आरोपींची ओळख पटवून त्यांना बेड्या ठोकल्या. एवढेच नव्हे, तर तपासादरम्यान पोलिसांनी तातडीने पावले उचलत अपहारीत रकमेपैकी एकूण ८१ लाख ७८ हजार २८९ रुपये एवढी मोठी रक्कम बँक खात्यांमध्ये गोठवून (फ्रीज करून) ती आरोपींकडून वसूल केली आहे.

ही धडक आणि उत्कृष्ट कामगिरी बीडचे माननीय पोलीस अधीक्षक, माननीय अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या थेट मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलेश केळे, सपोनि संदीप आराक, पोउपनि स्वाती लहाने, पो.ह. पंचम वडमारे, भारत जायभाये, विजय घोडके आणि महिला पोलीस अंमलदार भाग्यश्री काशिद यांच्यासह सर्व सायबर पोलीस स्टेशन बीडच्या पथकाने केली आहे.

# भारत-नॉर्वे परिषदेत जळगावच्या उद्योजकाचा डंका

## मोहित बाफना यांनी जागतिक मंचावर मांडली भारताची ड्रोन व संरक्षण क्षमता



बीड दि. २५ (प्रतिनिधी) :

भारत आणि नॉर्वे यांच्यातील द्विपक्षीय सहकार्य अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानली गेलेली 'भारत-नॉर्वे व्यवसाय आणि संशोधन शिखर परिषद' नुकतीच नॉर्वेची राजधानी ओस्लो येथे संपन्न झाली. हरित ऊर्जा, संरक्षण, तंत्रज्ञान, आणि सागरी उद्योग अशा विविध क्षेत्रांतील धोरणात्मक भागीदारीवर या परिषदेत मंथन करण्यात आले. या जागतिक मंचावर जळगावचे सुपुत्र आणि तरुण उद्योजक मोहित बाफना यांनी भारताच्या संरक्षण आणि प्रगत ड्रोन तंत्रज्ञान क्षमतेचे प्रभावी सादरीकरण करून देशाचा गौरव वाढवला.

या हाय-प्रोफाइल परिषदेला भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, नॉर्वेचे पंतप्रधान जोनास गार स्टोरे, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि नॉर्वेचे युवराज हाकोन यांसारख्या दिग्गज जागतिक नेत्यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच

परिषदेत टाटा समूह, रिलायन्स इंडस्ट्रीज, भारत फोर्ज, अदानी समूह, लार्सन अँड टुब्रो आणि वारी समूह यांसारख्या भारतातील आघाडीच्या औद्योगिक समूहांनी सहभाग घेतला होता. यामध्ये वारी समूहाचे हितेश दोशी, सुहाना मसाल्याचे आनंद चोरडिया आणि मेहता इक्विटीजचे रजत मेहता यांसारख्या प्रमुख कॉर्पोरेट नेत्यांचा समावेश होता.

जागतिक मंचावर 'नर्चर एरोस्पेस'चे प्रतिनिधित्व या सर्व दिग्गजांच्या उपस्थितीत 'नर्चर एरोस्पेस प्रायव्हेट लिमिटेड'चे प्रतिनिधित्व करणारे मोहित बाफना हे परिषदेचे मुख्य आकर्षण ठरले. बाफना यांनी परिषदेदरम्यान झालेल्या उच्चस्तरीय चर्चांमध्ये भारताच्या वेगाने वाढणाऱ्या एरोस्पेस अभियांत्रिकी, स्वदेशी ड्रोन प्रणाली आणि संरक्षण उत्पादन क्षेत्रातील अद्ययावत क्षमता जगासमोर मांडल्या.

"आजचा भारत हा जागतिक एरोस्पेस आणि संरक्षण क्षेत्रात एक अत्यंत विश्वासार्ह आणि सक्षम भागीदार म्हणून उदयास येत आहे. भारताचे तरुण उद्योजक आणि खासगी क्षेत्र जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी भूमिका बजावण्यासाठी सज्ज आहेत," असा विश्वास मोहित बाफना यांनी या प्रसंगी व्यक्त केला.

उद्योग तज्ज्ञांच्या मते, बाफना आणि इतर भारतीय तरुण व्यावसायिक नेत्यांचा हा सक्रिय सहभाग भारत-नॉर्वे संबंधांना एका नव्या उंचीवर घेऊन जाणारा ठरेल. या परिषदेमुळे भविष्यात संरक्षण आणि शाश्वत औद्योगिक विकासाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परदेशी गुंतवणूक आणि तांत्रिक देवाणघेवाण होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

# रोटरी क्लबच्या पाणपोईचे गेवराईत छत्रपती शिवाजी महाराज चौकात शुभारंभ संपन्न




गेवराई, (प्रतिनिधी)- सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या येथील रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या वतीने ग्रामीण भागातील पादचाऱ्यासाठी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात पिण्याच्या पाण्याची पाणपोई नुकतीच सुरू केली आहे. गेवराई तालुक्यातील विविध भागातील ग्रामस्थ विविध कामासाठी शहरात येत असतात.

यावर्षी उन्हाळा अधिक तीव्र असल्याने पिण्याच्या पाण्याची गरज होती. रोटरी क्लबच्या संचालक मंडळ व सदस्य यांनी सेवा कार्य म्हणून विविध उपक्रम राबवत असतात. त्यातील हा एक उपक्रम राबविण्यात येत आहे. १५ मे २०२६ रोजी रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ चे गव्हर्नर रो. सुधीर लातुरे हे क्लब भेटीसाठी आले असता त्यांच्या हस्ते या पाणपोईचे उद्घाटन फीत कापून व रोटरी फलकाला पुष्पमाला घालून करण्यात आले. याप्रसंगी डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी डॉ. राजगोपाल तापडिया, सहप्रांतपाल रो. कल्याण कुलकर्णी, रो . नितिन गोपन यांचे स्वागत बालाजी किराणाचे मालक सुरेश मानधने, रो. रामदास शिंदे, प्रा. रामप्रभु मुंडे, सेवानिवृत्त प्राचार्य रो. नागनाथ घसिंग यांनी केले.

पिण्याच्या पाण्याची गरजवंत ग्रामस्थांना सोय क्लबने केली यासारखे पुण्य नाही. रोटरी क्लबच्या कार्याचे त्यांनी कौतुक केले. सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र बरकसे यांनी केले. आभार सचिव रो. प्रविण जैन यांनी मानले. यावेळी रोटरी क्लब ऑफ गेवराईचे अध्यक्ष प्रा. राजेंद्र बरकसे, सचिव रो प्रविण जैन, सहसचिव डॉ नागनाथ मोटे, क्लब प्रशासक रो. गणेश कुलकर्णी, रो. राजेंद्र डेंगे, प्रोजेक्ट सर्विस चेअरमन धर्मराज करपे , राधाकिसन लड्डा यांच्यासह रोटेरियन व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आठ महिन्यांत फुलले 'ऑक्सिजन पार्क'; भर उन्हाळ्यातही हिरवागार परिसर : दीपक देशमुख

## एक एकर परिसरात बारा हजार झाडांची लागवड



परळी वैजनाथ प्रतिनिधी : आजच्या काळात वेगाने होणारी वृक्षतोड, वाढते प्रदूषण आणि बदलते हवामान ही गंभीर समस्या बनली आहे. अशा परिस्थितीत पर्यावरण संवर्धनासाठी केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृती करणारे हात फार कमी दिसतात. परळी शहराचे माजी नगराध्यक्ष दीपक रंगनाथ देशमुख यांनी मात्र आपल्या कृतीतून एक प्रेरणादायी आदर्श उभा केला आहे.

महाविद्यालय परिसरात अवघ्या आठ महिन्यांपूर्वी उभारण्यात आलेले 'ऑक्सिजन पार्क' आज भर उन्हाळ्यातही हिरवागार आणि टवटवीत दिसत आहे. या पार्कमध्ये विविध प्रकारची झाडे लावण्यात आली असून त्यांची योग्य निगा राखल्यामुळे परिसराला नैसर्गिक सौंदर्य लाभले आहे. कडक उन्हाळ्यातही या ठिकाणी गारवा आणि प्रसन्न वातावरण अनुभवायला मिळत असल्याने नागरिकांकडून या उपक्रमाचे मोठे कौतुक होत आहे.

"झाडे लावा, झाडे जगवा आणि पर्यावरण वाचवा" हा संदेश देत दीपक देशमुख यांनी समाजासमोर एक सकारात्मक उदाहरण ठेवले आहे. पर्यावरणाचा वाढता ऱ्हास थांबवण्यासाठी प्रत्येकाने आपल्या परीने वृक्षलागवड करून त्यांचे संगोपन करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

आज अनेक ठिकाणी विकासाच्या नावाखाली झाडांची मोठ्या प्रमाणात तोड होत असताना, दीपक देशमुख यांचा हा उपक्रम पर्यावरण प्रेमींसाठी प्रेरणादायी ठरत आहे. भविष्यातील पिढ्यांना शुद्ध हवा, हिरवेगार वातावरण आणि निरोगी जीवन मिळावे यासाठी अशा प्रकारचे उपक्रम प्रत्येक गावात, प्रत्येक शहरात राबविण्याची गरज व्यक्त होत आहे.

"एक झाड हजारो श्वासांचे जीवन असते"

हा संदेश देणारे दीपक देशमुख यांचे 'ऑक्सिजन पार्क' सध्या परळी शहरात चर्चेचा विषय बनले आहे.

# १ जून पासून खाजगी कापूस खरेदी बंद राहणार- सभापती जयदत्त नरवडे



माजलगाव २५. (प्रतिनिधी) कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यक्षेत्रांमधील सर्व जिनिंग वर खाजगी कापूस खरेदी दि.०१ जून पासुन बंद राहणार असून तरी सर्व कापूस उत्पादक शेतकरी बांधवांनी आपला शिल्लक राहिलेला कापूस दिनांक १ जून २०२६ पर्यंत खाजगी जिनिंग वर विक्रीस आणावा असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत नरवडे उपसभापती श्रीहरी मोरे सचिव हरिभाऊ सवणे यांनी केले आहे.

कापूस हंगाम २०२५-२६ मध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यक्षेत्रामध्ये केंद्र शासनामार्फत (सीसीआय) १५ मार्च२०२६ पर्यंत कापूस खरेदी झाली होती. त्यानंतर खाजगी कापूस केंद्रावर कापूस खरेदी सुरू आहे व तसेच सध्या खाजगी कापूस केंद्रावर हमीभावापेक्षा जास्त भाव मिळत आहे तरी शिल्लक राहिलेल्या कापूस उत्पादक शेतकरी बांधवांनी आपला कापूस दि. ०१ जून २०२६ पर्यंत खाजगी जिनिंग वर विक्रीस आणावा असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे उपसभापती श्रीहरी मोरे सचिव हरिभाऊ सवणे यांनी केले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक राजेभाऊ फड यांच्या उमेदवारीसाठी ॲड. जीवन देशमुख सरसावले

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) धाराशिव-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) तसेच महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून पक्षाचे राज्य सरचिटणीस राजेभाऊ फड यांना उमेदवारी देण्यात यावी, अशी जोरदार मागणी परळीचे माजी शहराध्यक्ष ॲड. जीवन देशमुख यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्याकडे केली आहे.

विकासाची दृष्टी आणि जनसंपर्क

राजेभाऊ फड यांचे उद्योग क्षेत्रातील कार्य अत्यंत मोठे असून, त्यांचा तिन्ही जिल्ह्यांत दांडगा जनसंपर्क आहे. त्यांची विकासाची दूरदृष्टी लक्षात घेता, पक्षाने त्यांना या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जागेवर संधी देणे गरजेचे आहे, असे देशमुख यांनी म्हटले आहे.

**अन्याय दूर करण्याची मागणी** | मागच्या विधानसभा निवडणुकीत राजेभाऊ फड यांची उमेदवारी जवळपास निश्चित झाली होती पण ऐनवेळी त्यांना उमेदवारी नाकारण्यात आली होती. त्यामुळे त्यांच्यावर झालेला अन्याय दूर करण्यासाठी आणि त्यांच्यासारख्या सक्षम, अभ्यासू युवकाला न्याय देण्यासाठी पक्षाने त्यांना विधान परिषदेवर पाठवावे, अशी मागणी आता परळीतून जोर धरत आहे. फड यांच्या उमेदवारीमुळे महाविकास आघाडीला तिन्ही जिल्ह्यात मोठे बळ मिळेल, असा विश्वासही ॲड. देशमुख यांनी व्यक्त केला आहे.

# सकल जैन समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

## मध्य प्रदेशातील साध्वींची हत्या करणाऱ्यांवर कारवाईची मागणी




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ मे**

मध्य प्रदेशातील रिवा भागात विहारत असलेल्या साध्वींजींना कारने धडक देऊन त्यांची हत्या करणाऱ्या कार चालकावर कठोर कारवाई करावी तसेच जैन मुनी व साध्वींना संरक्षण द्यावे या मागणीसाठी दि २५ मे रोजी सकल जैन समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मुक मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यु बोधवड यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

शहरातील महात्मा गांधी चौकातून सकाळी अकरा वाजता सकल जैन समाजाच्यावतीने मुक मोर्चा काढण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने महिला व पुरूष सहभागी झाले होते. हा मुक मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत आल्यानंतर त्याठिकाणी जिल्हा प्रशासनाला मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

त्यामध्ये मध्य प्रदेशातील रिवा येथे विहारत असलेल्या जैन साध्वींना एका कार चालकाने पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात साध्वींचा मृत्यू झाला आहे. या अपघानानंतर कार चालकाने सुमारे ५० ते ६० किमी अंतरापर्यंत भरधाव वेगाने कारसह पळ काढला. यावरून कार चालक पूर्णपणे शुध्दीत होता. चालकाने मुद्दाम साध्वीजींना धडक देऊन अपघात घडविल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. सदर घटना अपघात नसून साध्वीजींची हत्या असल्याचे आरोप जैन समाजाने केला आहे. सदरील कार चालकाला अटक करण्यात आली असून त्याच्यावर हत्येचा गुन्हा नोंदवून कठोर कारवाई करावी तसेच यापुढे देशभरात भ्रमंती करणाऱ्या जैन मुनी व साध्वींना पोलिस संरक्षण द्यावे अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

यावेळी मिलींद यंबल, चंद्रेशेखर कान्हेड, रत्नदिपक सावजी, रत्नाकर महाजन, वंदना सोविएतकर, नंदकुमार रवणे यांच्यासह सकल जैन समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# इंधन पुरवठा सुरळीत करण्यासाठी काँग्रेसचे हिंगोलीत ठिय्या आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ मे**

जिल्ह्यासह राज्यात इंधन पुरवठा सुरळीत करावा, नीट पेपर लिक प्रकरणी केंद्रीय शिक्षा मंत्री यांचा राजीनामा घ्यावा, नाणे टंचाई दूर करावी आदी मागण्यांसाठी दि २५ मे रोजी काँग्रेसच्यावतीने ठिय्या आंदोलन करण्यात आले.

शहरातील इंदिरा गांधी पूतळ्यासमोर सोमवारी जिल्हा काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एक तास ठिय्या आंदोलन केले. यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ सतीश पाचपुते, प्रदेश पदाधिकारी जकी कुरेशी, माजी जिल्हाध्यक्ष सुरेशअप्पा सराफ, दत्तराव कदम, मिलींद उबाळे, डॉ नीळकंठ गडदे, अतुल नायक, डॉ साहेबराव देवकते, नंदकुमार पाटील, ॲड प्रदीप पोले, रवी काकरे, भगवान खंदारे, शासन कांबळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले होते.

राज्यासह जिल्ह्यात इंधन तुटवडा निर्माण झाल्याने शेतीची कामे ठप्प पडली असून पेरणीपूर्व मशागतीचे कामे न झाल्यास पेरणी कशी करावी असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहीला आहे. याशिवाय इंधन मिळत नसल्याने नागरिकांना वाहनाद्वारे प्रवास करणेही कठीण झाले आहे. केंद्र शासन व राज्य शासनाचे चुकीचे धोरण यासाठी कारणीभूत असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. शासनाने वाहनासाठी मुबलक इंधन उपलब्ध करून द्यावे तसेच वाहनांचे आरसी बुक दाखविल्यानंतर कॅनमध्ये इंधन देण्याची मागणी करण्यात आली आहे. इंधन दरवाढ मागे घेण्यात यावी.

याशिवाय बँकाकडून नाणे टंचाईचे कारण दाखवून पैसे देण्यास नकार दिला जात आहे. त्यामुळे बाजारपेठेतील व्यवहार ठप्प होत असून नागरिकांना स्वत:चे पैसे बँकेतून वैळेवर मिळत नसल्याने आर्थिक अडचणींचा सामाना करावा लागत आहे. त्यामुळे नाणे टंचाई दूर करावी अशी मागणी करण्यात आली आहे. इंधन व नाणे टंचाई तत्काळ दूर करावी अन्यथा काँग्रेसच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

# बकरी ईदनिमित्त होणारी गोवंश हत्या थांबवावी–विहिंप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ मे**

बकरी ईद दरम्यान जाणीवपूर्वक होणारी गोवंशाची कुर्बानी थांबविण्यात यावी अशी मागणी विश्व हिंदू परिषदेच्यावतीने जिल्हा प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

देशात व राज्यात गोवंश हत्या बंदीचा कायदा लागू आहे परंतु अजुनही मोठ्या प्रमाणात गोवंश हत्या चालू आहे. भारतीय शेती, अर्थव्यवस्था, पर्यावरण व संस्कृतीचा कणा असलेल्या गोवंशाची हत्या मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून कायदा व समाजव्यवस्था व भारतीय संविधानाच्या तत्वांच्या विरोधात आहे. महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमानुसार संपूर्ण गोवंश हत्याबंदी आहे व त्याचे उल्लंधन हा दंडनीय गुन्हा आहे. जिल्ह्यात होणारी गोवंश हत्या ही केवळ कायद्याचे उल्लंघन नसुन त्याद्वारे जाणीवपूर्वक सामाजिक सलोखा बिघडवण्याचे षडयंत्र रचले जात आहे. गोवंश हत्येच्या प्रक्षोभक घटनांमुळे सर्वसामान्यांचय धार्मिक भावना दुखावून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्याचा प्रयत्न काही समाजकंटकांकडून होत आहे. त्यामुळे संभाव्य सामाजिक तणाव आणि कायदा व सुव्यवस्थेची हानी टाळण्यासाठी प्रशासनाने कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी अशी मागणी विश्व हिंदू परिषदेकडून निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर बजरंग दलाचे संयोजक कैलाश श्रीनाथ, विहिंपचे राजेंद्र हलवाई, प्रदीप धडवाई, केशव मुटकुळे, शुभव श्रीबास, बद्रीनारायण सारडा आदीच्या स्वाक्षऱ्या आहेत.



**हिंगोली– एकीकडे राज्य शासन व प्रशासन मुबलक इंधन उपलब्ध करीत असल्याचा दावा करीत आहे परंतु जिल्ह्यात सकाळपासूनच जवळपास सर्व पेट्रोलपंपासमोर डिझेलसाठी वाहनांच्या रांगा लागत असून त्यामुळे पेट्रोलपंप चालकांची चांगलीच तारांबळ उडत आहे. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### पवार पब्लीक स्कूलमध्ये गुणवंतांचा सत्कार



हिंगोली– शहरातील पवार पब्लिक स्कूल येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी माजी शिक्षणाधिकारी शिवाजी पवार यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थांचा सत्कार करण्यात आला. पवार पब्लिक स्कुल मधील सचिन गजानन वाकडे या या विद्यार्थ्याला दहावी मध्ये ९४.२० टक्के गुण प्राप्त झाले तर सर्वोदया रजनीश ढाले या विद्यार्थिनीला दहावीला ९१.८० टक्के प्राप्त झाले आहेत. सचिन वाकडे हा शाळेत पहिला तर सर्वोदया ढाले ही शाळेत दुसरी आली आहे. या दोन्ही गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी पवार पब्लिक स्कूलचे अध्यक्ष प्रणव शिवाजी पवार, गोविंदराव वाकडे, पालक गजानन वाकडे, रजनीश ढाले, यांच्यासह शाळेतील कर्मचारी उपस्थित होते.

### हनकदरीत उष्माघाताने एकाचा मृत्यू

हिंगोली–सेनगाव तालुक्यातील हनकदरी शिवारात उष्माघाताने एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. उष्णतेमुळे जिल्ह्यातील चौथा बळी गेला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार सेनगाव तालुक्यातील हनकदरी येथील उकंडी उर्फ संतोष गोपाल धाबे वय ४८ हे शनिवारी कामानिमित्त घरातून बाहेर पडले होते. मात्र सायंकाळी उशिरापर्यंत ते घरी आले नसल्याने त्यांच्या कुटुंबियांनी त्यांचा शोध सुरू केला होता. रविवारी दि २४ मे रोजी काही मुले पोहण्यासाठी जात असतांना त्यांना उकंडी उर्फ संतोष यांचा मृतदेह हनकदरी शिवारातील एका झाडाखाली दिसून आला. या घटनेची माहीती मिळाल्यानंतर सेनगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दिपक मस्के, उपनिरीक्षक रविकिरण खंदारे, जमादार जीवन मस्के, जैस्वाल, सुभाष चव्हाण यांच्या पथकाने भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी मृतदेह सेनगाव येथील ग्रामीण रूग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी आणला होता. उत्तरीय तपासणीच्या अहवालात उकंडी उर्फ संतोष धाबे यांचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचे नमुद केले आहे. याप्रकरणी भिकाजी धाबे यांच्या माहीतीवरून सेनगाव पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. जमादार जीवन मस्के हे पुढील तपास करीत आहेत. मयत उकंडी यांचय पश्चात आई, पत्नी, दोन मुले, भाऊ असा परिवार आहे.

### २३५ वाहन चालकांविरूध्द कारवाई

हिंगोली– अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २३५ वाहन चालकाविरूध्द कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून २ लाख ७९ हजार ९०० रूपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

# प्रभाग क्रमांक एकमध्ये सुरळीत पाणीपुरवठा करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ मे**

शहरातील प्रभाग क्रमांक एकमधील जिजामाता नगर, खुशालनगर, आदर्श कॉलेज परिसरातील नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा करण्यात यावा अशी मागणी येथील रहीवाशांनी शिवसेना गटनेते श्रीराम बांगर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मागील वर्षभरापासून प्रभाग क्रमांक एक मधील आदर्श महाविद्यालयाजवळील पाण्याच्या टाकीत नियमित पाणीपुरवठा होत नाही. सर्व ऋतुमध्ये या परिसरातील नागरिकांना अनियमित पाणीपुरवठा होत असल्यामुळे तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. यावर कायमस्वरूपी उपाययोजना करावी तसेच पाण्याच्या टाकीत नियमित पाणी सोडावे, शिस्तबध्द पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे, उपलब्ध पाणीसाठा व टाकी भरत असल्याबाबत इंडीकेटर उपलब्ध करावे, पाणी सोडणाऱ्या कर्मचाऱ्यांना वागणुकीबाबत ताकीद द्यावी, आदर्श कॉलनी, विवेकानंद नगर, हिलटापॅ कॉलनी, भाग्य नगर, गोविंद नगर या भागात वेगवेगळे डीपी द्यावेत, पाणीपुरवठ्याचा कालावधी वाढवून द्यावा, बंद पडलेले पथदिवे दुरूस्त करून द्यावे आदी मागण्यांचे निवेदन या प्रभागातील नागरिकांनी शिसेना गटनेते श्रीराम बांगर यांना सादर केले आहे. यावेळी गटनेते श्रीराम बांगर यांनी रहीवाशांच्या सर्व समस्या लवकरच मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

# युवकाचे अपहरण करून बेदम मारहाण, चौघांविरूध्द गुन्हा दाखल



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २५ मे**

शहरात भरदिवसा एका युवकाचे अपहरण करून त्याला अमानुषपणे मारहाण करण्यात आल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे या मारहाणीचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून त्यामध्ये युवकावर होत असलेली निर्दयी मारहाण पाहून नागरिक हादरले आहेत.

या प्रकरणी वसमत शहर पोलीस ठाण्यात भरत क्षीरसागर, विजेंद्र क्षीरसागर (रा. वसमत), साई गिरी (रा. विरेगाव) आणि त्याच्या एका साथीदाराविरोधात गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी कोडिबा बालाजी क्षीरसागर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदविला.

दि २२ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास विजेंद्र यांच्या शेतात आरोपींनी फिर्यादीला बोलावून घेतले. आमच्याविषयी माहिती का देतोस? भांडणे का लावतोस? असा जाब विचारत आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी व काठीने बेदम मारहाण केल्याचा आरोप आहे. एवढ्यावरच न थांबता संबंधित युवकाला जबरदस्तीने काळ्या रंगाच्या चारचाकी वाहनात कोंबून नेण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर वाऱ्यासारखा पसरला असून त्यामध्ये युवकाला जमिनीवर पाडून अमानुष मारहाण केली जात असल्याचे स्पष्ट दिसत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बोंडले हे करीत आहेत.

# महाराष्ट्र इंजिनिअर्स असोसिएशनच्या जिल्हाध्यक्षपदी अमितकुमार काबरा

## बेरोजगार अभियंत्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लढणार– काबरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ मे**

महाराष्ट्र इंजिनिअर्स असोसिएशनच्या (सुशिक्षित बेरोजगार अभियंता संघटना) हिंगोली जिल्हा कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक दि २२ मे २०२६ रोजी हिंगोली येथे अत्यंत उत्साहात पार पडली.

या बैठकीत इंजि. अमितकुमार बाळकृष्णजी काबरा (रा. वसमत यांची हिंगोली'जिल्हाध्यक्ष'पदावर सर्वानुमते आणि बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल जिल्ह्यातील सर्व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांकडून जोरदार स्वागत होत आहे.

संघटनेचे निवडणूक निर्णय अधिकारी इंजि. प्रकाश गुट्टे यांच्या देखरेखीखाली ही निवडणूक प्रक्रिया पार पडली. इंजि. अमितकुमार काबरा यांची आगामी दोन वर्षांच्या (२२/०५/२०२६ ते २१/०५/२०२८) कालावधीसाठी ही नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रसंगी संघटनेचे राज्य सरचिटणीस इंजि. एम. ए. हकीम, राज्य अध्यक्ष इंजि. प्रदीप पडोळे आणि नांदेडचे जिल्हाध्यक्ष इंजि. दिलीप बालसकर प्रामुख्याने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते नवनियुक्त जिल्हाध्यक्षांना अधिकृत नियुक्ती पत्र प्रदान करून पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांच्या रोजगाराचे प्रश्न, शासकीय कंत्राटांमधील त्यांचे हक्क आणि स्थानिक पातळीवरील समस्या सोडवण्यासाठी मी कटिबद्ध राहीन. संघटनेने दाखवलेला विश्वास सार्थ ठरवून हिंगोली जिल्ह्यात संघटनेची घोडदौड अधिक मजबूत करू असे आश्वासन यावेळी नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष अमित कुमार काबरा यांनी दिले.

या महत्त्वपूर्ण निवड बैठकीला माजी जिल्हाध्यक्ष इंजि. गुलाम कुरेशी, विठ्ठल शिंदे, एम. के. कोटकर, भूषण जयस्वाल, दिनेश जाधव, संकेत इंगोले, सचिन हुंबाड यांच्यासह हिंगोली जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. इंजि. काबरा यांच्या निवडीबद्दल संघटनेचे पदाधिकारी, राजकीय, सामाजिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# लाखो रुपयांचा सिमेंट रस्ता 'कागदावर मजबूत' पण प्रत्यक्षात उखडला; सय्यद गुत्तेदाराच्या निकृष्ट कामामुळे नागरिक संतप्त!

## अर्धवट काम, उघडी पडलेली खडी, तडे गेलेले रस्ते आणि साईट पंखेही अपूर्ण; प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह

**तभा वृत्तसेवा**
**जालना । सुरेश कवडे पाटील**

परतूर शहरात लाखो रुपये खर्च करून करण्यात आलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामाची अक्षरशः दयनीय अवस्था झाली असून संबंधित सय्यद गुत्तेदाराच्या निकृष्ट व बोगस कामकाजामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. वखार महामंडळ ते बस स्थानक या महत्त्वाच्या मार्गावर करण्यात आ-लेले सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम केवळ नावापुरतेच झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. शासनाच्या अंदाजपत्रकानुसार दर्जेदार काम होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात मात्र अर्धवट काम, कमी प्रतीचे साहित्य, अपूर्ण साईट पंखे आणि काही महिन्यांतच उघडी पडलेली खडी यामुळे या रस्त्यांचा दर्जा उघड झाला आहे.

परतूर नगर परिषद निवडणुका डोळ्यासमोर ठेवून शहरात विविध विकासकामांचा धडाका लावण्यात आला होता. त्याच पार्श्वभूमीवर वखार महामंडळ ते बस स्थानक या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम मोठ्या गाजावाजात सुरू करण्यात आले होते. मात्र काम सुरू झाल्यानंतर काही भागातच काँक्रिटीकरण करून उर्वरित रस्ता अर्धवट अवस्थेत सोडण्यात आला. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित गुत्तेदाराने काम पूर्ण करण्याऐवजी निधी उचलण्यावरच भर दिला असून प्रत्यक्ष कामाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. विशेष म्हणजे ज्या ठिकाणी सिमेंट रस्ता तयार करण्यात आला त्या भागातही अवघ्या चार ते पाच



महिन्यांतच खडी उखडून बाहेर पडू लागली आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांना मोठमोठे तडे गेले असून काँक्रिटची पकड सैल झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. त्यामुळे या कामात मोठ्या प्रमाणावर निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सिमेंटचे प्रमाण कमी ठेवून केवळ दिखाऊ काम करण्यात आल्याची चर्चा परिसरात जोर धरत आहे.

रस्त्याच्या दुतर्फा भरण्यात येणारे साईट पंखे देखील अद्याप पूर्ण करण्यात आलेले नाहीत. परिणामी अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला मोठे खड्डे निर्माण झाले असून वाहनचालक व पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.



विशेषतः रात्रीच्या वेळी अपूर्ण कामामुळे अपघात होण्याचा धोका वाढला असून नागरिकांच्या जीविताशी खेळ सुरू असल्याची भावना व्यक्त होत आहे.

स्थानिक नागरिकांनी प्रशासनावरही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी कामाची गुणवत्ता तपासली का? काम पूर्ण होण्यापूर्वीच बिल मंजूर करण्यात आले का? निकृष्ट काम करणाऱ्या गुत्तेदारावर कारवाई का करण्यात आली नाही? असे अनेक सवाल आता उपस्थित केले जात आहेत. लाखो रुपयांचा निधी खर्च होऊनही रस्त्यांची एवढ्या कमी कालावधीत झालेली दुरवस्था ही प्रशासनाच्या निष्क्रियतेचे जिवंत उदाहरण असल्याची टीका नागरिक करत आहेत. परिसरातील नागरिकांनी या संपूर्ण कामाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली असून संबंधित गुत्तेदाराला देण्यात येणारे बिल तात्काळ रोखावे, निकृष्ट दर्जाचे झालेले काँक्रिटीकरण तोडून नव्याने दर्जेदार रस्ता तयार करावा तसेच दोषी अधिकारी व गुत्तेदारावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

दरम्यान, शहरातील नागरिकांमध्ये या प्रकरणामुळे तीव्र नाराजी असून विकासाच्या नावाखाली भ्रष्टाचाराचा रस्ता तयार झाला का? असा संतप्त सवाल आता सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत. संबंधित विभागाने वेळेत दखल घेतली नाही त्यामुळे नागरीकांतुन संताप व्यक्त होत आहे.

---

## संक्षिप्त

### युवा नेते राहुल लोणीकर यांना विधानपरिषदेची उमेदवारी द्या

#### भाजपचे शरद पाटील यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तळणी । प्रतिनिधी**



नगर संभाजी जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघाच्या आगामी होणाऱ्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष च्या वतीने उमेदवारी प्राप्त करण्यासाठी अनेक हालचालींना वेग आला आहे. भाजपचे प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांना अधिकृत उमेदवारी द्यावी अशी मागणी भाजपाचे मंठा तालुका उपाध्यक्ष शरद पाटील यांनी केली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मजबूत जनसंपर्क युवकांमध्ये अस-लेली त्यांची प्रतिमा व संघटन कौशल्य प्रभावी नेतृत्व असल्याने त्यांना पक्षाच्यावतीने उमेदवारी दिली पाहिजे अशी मागणी त्यांनी एका प्रसिद्धी पत्रकार द्वारे केली आहे तसेच या मागणीचा विचार व्हावा यासाठी पक्षातील वरिष्ठ नेतृत्वांची भेट घेऊन त्या संदर्भातील मागणी करणार असल्याचे शरद पाटील यांनी सांगितले. परतुर मतदार संघातील सक्षम उमेदवार राहुल लोणीकर ठरू शकतात भाजप कार्यकर्त्या कडून असा दावा केला जात आहे. राहुल लोणीकर यांनी जालना जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष पद म्हणून काम करताना ग्रामीण भागातील विविध विकास कामावर भर दिला होता जिल्हा परिषद पंचायत समिती सदस्य ग्रामपंचायत आणि नगरपरिषद पातळीवरील अनेक लोकप्रतिनिधीशी त्यांचा थेट संपर्क असल्याचे मानले जाते. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात त्यांना अनुकूल वातावरण आहे. यामुळे लोणीकर यांना उमेदवारी देण्याची मागणी होत आहे.

### अंबड तालुक्यात जनगणनेचे काम प्रगतिपथावर



**तभा वृत्तसेवा**
**अंबड । प्रतिनिधी**

जनगणना २०२७ च्या पूर्वतयारीसाठी जालना जिल्ह्यात सध्या 'हाऊस लिस्टिंग ब्लॉक्स'चे काम युद्धपातळीवर सुरू आहे. यात अंबड तालुक्याने अत्यंत उल्लेखनीय काम केले आहे. २२ मे पर्यंतच्या आकडेवारीनुसार, अंबड शहर आणि ग्रामीण भागातील एकूण ४५४ ब्लॉक्सपैकी ४४८ ब्लॉक्समध्ये कामाला सुरुवात झाली असून, प्रशासकीय यंत्रणा पूर्णपणे कार्यरत झाली आहे.
अंबड तालुक्याचे प्रशासकीय विभाजन करून नगरपालिका व ग्रामीण अशा पद्धतीने करण्यात आला आहे. दोन्ही ठिकाणी कामाचा वेग समाधानकारक आहे. नगर परिषद क्षेत्रात एकूण ५५ ब्लॉक्स आहेत. यापैकी ५४ ब्लॉक्समध्ये तर, ग्रामीण भागात ३९९ ब्लॉक्सपैकी ३९४ ब्लॉक्समध्ये काम प्रगतिपथावर आहे. विशेष म्हणजे, शहर आणि ग्रामीण भागात काम सुरू न झालेल्या ब्लॉक्सची टक्केवारी अनुक्रमे अवघी १.८२ टक्के आणि १.२५ टक्के इतकी नगण्य आहे. या मोहिमेसाठी अंबड शहर चार्ज ऑफिसर मनोज उकिरडे, सहायक जनगणना ऑफिसर सुधीर जाधव, नगरपरिषदेचे जनगणना नोडल ऑफिसर रामेश्वर घोळवे, जनगणना संगणक अधिकारी शेख, प्रभारी लिपिक कृष्णा हापसे आणि तांत्रिक सहायक तेजस ठोसर यांच्यासह पर्यवेक्षक काळे भागवत, रेडे पी. डी., धनंजय गुळवणे, सुरेश मुंढे, मगर आणि प्रगणक पाटेकर जे. बी., मोरे जे. बी., विजय भोजने, रामेश्वर बुलबुले, भारत मरकड, तीर्थराज गोरडे, स्वप्निल देशमुख, उमेश सोळंके, किसन केसकर आदी कर्मचारी व अधिकारी परिश्रम घेत आहेत.

---

# आष्टी आणि कोकाटे हादगाव सर्कलमध्ये वादळाचे थैमान

## नुकसानग्रस्तांना मदतीचे आ.बबनराव लोणीकर यांचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**



परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघातील आष्टी व कोकाटे हादगाव या दोन सर्कलमध्ये शनिवारी सायंकाळी झालेल्या भीषण वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांचे शेतातील सोलर पॅनल उखडून पडले असून काही ठिकाणी ते वाऱ्यामुळे उडून गेले आहेत. तसेच शेडनेट, पॉलिहाऊस आणि जनावरांसाठी उभारलेले शेडही वादळात उद्ध्वस्त झाले आहेत. या नैसर्गिक आपत्तीमुळे द्राक्ष व केळीच्या बागांचे मोठे नुकसान झाले असून उभा असलेला ऊस जमिनीवर आडवा पडला आहे. आंब्याच्या बागांनाही मोठा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी मोठमोठी झाडे उन्मळून पडल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, फुलवाडी (ता. परतूर) येथील अर्जुन गणेश घनवट यांच्या शेतात वीज पडून एक बैल जागीच ठार झाला. तसेच झाडाखाली आसरा घेतलेल्या मनीषा विराज शेळके या महिलेच्या अंगावर लिंबाच्या झाडाची मोठी फांदी कोसळल्याने त्या गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेची माहिती भाजपाचे तुकाराम सोळंके व लोणीचे सरपंच गजानन लोणीकर यांनी दूरध्वनीद्वारे भाजपा नेते, माजी मंत्री तथा मंठा-परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांना दिली. माहिती मिळताच आमदार लोणीकर यांनी परतूरचे तहसीलदार जाधव तसेच उपविभागीय कृषी अधिकारी राम रोडगे यांना तातडीने नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचा अहवाल तात्काळ राज्य शासनाकडे पाठवून त्यांना आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासनही आमदार लोणीकर यांनी दिले आहे.

---

# बदनापूर पोलिसांची धडक कारवाई; १२ लाखांहून अधिकचा गुटखा व पानमसाला जप्त

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**



मानवी आरोग्यास घातक ठरणाऱ्या प्रतिबंधित गुटखा व पानमसाल्याच्या अवैध वाहतुकीवर बदनापूर पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल १२ लाख ६६ हजार ४३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.
पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधु तसेच अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिबंधित गुटखा विक्री व वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त माहिती मिळाली की, एक आरोपी अशोक लेलँड वाहनातून मोठ्या प्रमाणात गुटखा व पानमसाला घेऊन बाजार गेवराई मार्गे बदना-पूरकडे येत आहे.

या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या पथकाने सापळा रचून वाहन क्रमांक चक-२०-एड-२१९४ ताब्यात घेतले. वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात राजनिवास पान मसाला, गोवा-१०००, वी-१ विंग तंबाखू, विमल पान मसाला तसेच के.एन.-०१ जाफरानी जर्दा आढळून आला. या कारवाईत सुमारे १२ लाख ६६ हजार ४३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी जावेद गुलाब मिर्झा बेग (वय ३४, रा. शेकटा, ता. जि. छत्रपती संभाजीनगर) याच्याविरुद्ध बदनापूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २७८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १२३, २२३, २७५, ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोउपनि श्री. कुकलारे करीत आहेत. सदर कारवाईत पोउपनि राजेंद्र वाघ यांच्यासह पो-लीस अंमलदार सागर बाविस्कर, देविदास भोजने, दत्ता वाघुंडे, आक्रूर धांडगे, धिरज भोसले, सोपान क्षीरसागर, सचिन राऊत, अशोक जाधव आदींनी सहभाग घेतला.

---

# मंठा तालुक्यात पूर्णा नदीतून अवैध वाळू उपसा; पोलिसांची धाडसी कारवाई, जेसीबी जप्त

**तभा वृत्तसेवा**
**मंठा । प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील पूर्णा नदी पात्रातून अधिकृत घाटांच्या नावाखाली अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याच्या तक्रारी वारंवार होत असतानाही संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नव्हती. सामाजिक संघटना आणि पक्ष नेत्यांनीही याबाबत निवेदने दिली होती, मात्र महसूल प्रशासन दुर्लक्ष याकडे दुर्लक्ष करत होते.
दरम्यान, शुक्रवारी दुपारी मंठा पोलिसांनी कानडी येथील अधिकृत घाटावर छापा टाकत अवैध वाळू उपसा करणारी जेसीबी रंगेहात जप्त केली. या कारवाईमुळे संबंधित घाटातून यंत्रांच्या साहाय्याने बेकायदेशीर वाळू उपसा सुरू असल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. लोकप्रतिनिधींचा वरदहस्त लाभलेल्या वाळूमाफियांवर पोलिसांनी कारवाई केली असली तरी महसूल प्रशासन त्यांना वाचविण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप होत आहे. मंठा तालुक्यातील अनेक अधिकृत घाटांवर पोकलेन व जेसीबी यंत्राच्या सहाय्याने दिवस-रात्र वाळू उपसा सुरू असल्याचे सांगितले जाते. तहसीलदार सुमन मोरे, मंडळ अधिकारी आणि संबंधित तलाठी यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. मंठा ते छत्रपती संभाजीन-गरपर्यंत अनेक निवेदने देऊनही महसूल विभागाकडून कोणतीही कारवाई न झाल्याने या प्रकरणात संगनमत असल्याचे आरोपही पुढे येत आहेत. परिणामी पूर्णा नदी पात्राचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. दरम्यान, पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख आणि त्यांच्या पथकाने केलेल्या या धाडसी कारवाईचे नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे. मंठा पोलिसांनी कारवाईत एमएच २१ एडी १७५७ या क्रमांकाची जेसीपी जप्त केली असून तिचा येथील संभाजी गणपत गोंडगे रा.इचा यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता कानडी घाट बंद करून एटीएस मोजणी करावी आणि संबंधित वाळूमाफियांवर विविध कलमांनुसार गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी नागरिक आणि पर्यावरणप्रेमींनी केली आहे

---

# अवैद्य रेतीची वाहतुक करणाऱ्या ३ ट्रॅक्टरवर पोलिसांची कारवाई



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन । प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील जवखेडा शिवारात पुर्णा नदीपात्रात अवैध वाळु वाहतुक होत असल्याची गुप्त माहीती ता. २३ शनिवार रोजी येथील प्रभारी पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांना एक खबर्यामार्फत प्राप्त झाल्याने त्यांनी सहकार्यासह जवखेडा शिवारात पुर्णा नदीच्या पात्रात अवैध रेती वाहतुक करणाऱ्या तीन ट्रॅक्टरवर कारवाई करण्यात आले आहे, सदरील कारवाई मध्ये जगदीश अशोक ढवळे रा. गव्हाण संगमेश्वर सतिष काकासाहेब शिंदे रा. गव्हाण संगमेश्वर मनोज संजय वाकेकर रा. तोडोली ता. भोकरदन यांच्या ताब्यातुन सोनालिका ट्रॅक्टर, फग्युसेन ट्रॅक्टर ट्रॉलीसह एकुण १२,९५,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल व अवैध वाळुची चोरटी वाहतुक करीत असताना मिळुन आल्याने त्यांच्यावर भा. न्या. संहीता कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. सदर कारवाई पोलीस निरीक्षक किरण बडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सागर शिंदे, पो.अ. शरद शिंदे, अर्जुन टेकाळे, गणेश पिंपळकर यांनी केली आहे.

---

# पं.स,च्या गृहनिर्माण अभियंत्यांकडुन पैश्याची मागणी; लाभार्थ्यांचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

परतुर तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांनी थेट बिडीओ कार्यालय गाठून घरकुल अभियंते व घरकुल अभियेत्यांनी ठेवलेला सहायक पैसे मागत आसल्याचे तक्रारी केल्या आहेत . स्वतः परतुर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्या समक्ष भेटून तक्रारी केल्या असता त्यांनी कोणालाही पैसे देऊ नये पैसे देण्याची आवश्यकता नाही त्याची माहिती दिल्यास चौकशी करून कारवाई करण्यात येईल असे आश्वासन त्यांनी यावेळी तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना बिडीओ यांनी दिले.



तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक घरकुल लाभार्थी आजही अर्धवट बांधकामात राहत असून पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण होईल का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाच्या योजनांचा लाभ खऱ्या गरजूंना मिळावा यासाठी प्रशासनाने कठोर भूमिका घेणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांतून होत आहे. दरम्यान, पंचायत समितीतील काही अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून संबंधित इंजिनिअरांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थांकडून केली जात आहे. घरकुल योजना ही गोरगरिबांच्या आयुष्याशी निगडित अत्यंत महत्त्वाची योजना मानली जाते. मात्र परतूर पंचायत समिती अंतर्गत सुरू असलेल्या कारभारामुळे अनेक लाभार्थ्यांचे स्वप्न अधांतरी राहिल्याचे चित्र दिसून येत आहे. आता जिल्हा प्रशासन व वरिष्ठ अधिकारी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन संबंधितांवर कारवाई करणार का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# खतांच्या तुटवड्याविरोधात देगलूर बंद

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २५ मे -**

खरीप हंगाम तोंडावर आला असताना डी.ए.पी., युरिया आदी रासायनिक खतांचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर सोमवार दि. २५ मे रोजी शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या वतीने देगलूर येथील कृषी सेवा केंद्रे, मोंढा बाजार व अडत दुकाने कडकडीत बंद ठेवून तीव्र आंदोलन करण्यात आले.

सोयाबीन, मुग, उडीद, कापूस आदी खरीप पिकांच्या पेरणीसाठी आवश्यक असलेली रासायनिक खते उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू अशी घोषणा करणाऱ्या शासनाकडून अन्नदाता




बळीराजालाच वेळेवर खते मिळत नसल्याने संताप व्यक्त करण्यात आला.

खतांच्या अभावामुळे अनेक शेतकऱ्यांना शेजारील तेलंगणा, आंध्रप्रदेश व कर्नाटक राज्यात जादा दराने खते खरेदी करण्यासाठी जावे लागत असून, प्रचंड उन्हात शेतीची कामे सोडून धावपळ करावी लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मानसिक, आर्थिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. खरीप हंगामासाठी डीएपी, युरिया व इतर रासायनिक खते मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

या आंदोलनात शिवसेना (ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, तालुकाप्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापुरकर, विधानसभा मतदारसंघ प्रमुख पांडुरंग पाटील थडके देगावकर, मतदारसंघ संघटक राजेंद्र इंगळे खानापूरकर, शहर संघटक मष्णाजी पैलावार, उपतालुकाप्रमुख मानाजी पाटील लोणे लोणीकर, अल्पसंख्याक सेनेचे तालुकाप्रमुख सय्यद मिरभाई, शहर प्रमुख इस्माईलखान पठाण, शहर प्रमुख भगवान जाधव, युवा सेना तालुकाप्रमुख तथा सोशल मीडिया नेटवर्क प्रमुख भागवत पाटील सोमुरकर, युवा सेना उपजिल्हाप्रमुख राहुल सोनकांबळे, युवा सेना शहर प्रमुख विनोद सोनकांबळे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

तसेच राजू उल्लेवार मुजळगेकर, गंगाधर पाटील चाकूरकर, राम राजुने, हाणमंत राजुरे लख्खेकर, शिवाजी सोनकांबळे मुजळगेकर, नागनाथ विभुते चैनपुरकर, अशोक मारवाडे, अजित पाटील पाळेकर, शिवाजी ढोसणीकर, संतोष कांबळे, देविदास घायाळे, गंगाधर वंकलवार आदींसह मोठ्या संख्येने शेतकरी, शेतमजूर, हमाल व मापाडी उपस्थित होते. आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस प्रशासनाकडून कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# इस्लापूर परिसरात गुटख्याची तस्करी

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २५ मे -**

गेल्या अनेक वर्षापासून चोरट्या मार्गाने तेलंगणातील निर्मल जिल्ह्यामधून अवैधरित्या गुटख्याची तस्करी खुलेआमपणे रासरोसपणे हिमायतनगर येथील किटका किंग च्या माध्यमातून चालू होती. पण या गुटखा किंग च्या मुसक्या आवळण्यात नांदेड येथील गुन्हे शाखेला अखेर प्रदीर्घ कालावधी नंतर यश मिळाले पण गुटखा तस्करी होत असल्याची बाब हिअन्न प्रशासन विभागास माहित नाही असे नव्हे? तरीसुद्धा अन्न प्रशासन विभाग झोपेची सोंग घेऊन आपले गुटखा तस्कराशी आर्थिक हित संबंध जोपासत असल्यानेच या गुटखा तस्कराच्या विरोधात एकही कारवाई अद्याप पर्यंत होऊ शकली नाही अशा प्रकारची चर्चा जनसामान्यातून ऐकावयास मिळत आहे.

## २७ लाखाच्या मुद्देमालासह तिघांना अटक

दि.२४ मे रोजी सायंकाळी ११:४५ च्या सुमारास नांदेड येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कोसमेट येथील आर्या बार जवळ गुटक्याची तस्करी करीत असलेले हिमायतनगर येथील दोन आरोपी व निर्मल जिल्ह्यातील सुवर्णा येथील एक आरोपी अशा तिघांच्या विरुद्ध गुटक्याची तस्करी करीत असताना मुद्देमालासह अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांना यश आले.

सदरील गुटखा तस्करी प्रकरणातील आरोपी सय्यद मोहम्मद अली सय्यद सादिक वय २१ वर्ष राहणार हिमायतनगर, सय्यद खमर रहिम कॉलनी हिमायतनगर, शेख मजहर राहणार सुवर्णा जिल्हा निर्मल तेलंगणा राज्यातून हे तिघेजण संगणमत करून मानवी शरीरास अपायकारक व महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला पानमसाला व गुटखा महिंद्रा बोलेरो पिकप क्र. चक२६उक२६४ या क्रमांकाच्या गाडीमध्ये त्यांचे स्वतः चे आर्थिक फायद्यासाठी चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने बोलेरो पिकप व गुटखा असा एकूण २७ लाख रुपयाचा मुद्देमाल घेऊन जात असताना मिळून आल्याने त्यांचे विरुद्ध फिर्यादी नागनाथ हनुमंत गोंडा तुकडे,पोलीस उपनिरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा रजिस्टर क्रमांक ७१/२०२६ कलम १२३,२७४,२७५,३(५) इछड व सह कलम २६,२७,३० (२) अन्नसुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ अन्वे दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक उमेश भोसले हे करीत आसून स्थानिक गुन्हे शाखेच्या या कारवाईमुळे गुटखा तस्करांचे धाबे दणाणले असून अशा स्वरूपाच्या कारवाया या अधून मधून व्हाव्यात अशा स्वरूपाची अपेक्षा जनतेमधून व्यक्त करण्यात येत आहे.

## मुदखेड येथे दिव्यांग बांधवांसाठी कृत्रिम अवयव वितरण शिबिर

**मुदखेड**-नांदेड जिल्ह्यातील अस्थिव्यंग व विविध प्रकारच्या दिव्यांग नागरिकांना कृत्रिम हातपाय, कॅलिपर्स, सहाय्यक उपकरणे व आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी विशेष ऑन दि स्पॉट तपासणी



व मोजमाप शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर डठ र्ढीीं, मध्यप्रदेश व ड्खचउज, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले असून दिव्यांग बांधवांसाठी ही एक मोठी दिलासादायक व लाभदायी संधी मानली जात आहे. सदर शिबिर दि. २८ मे २०२६ रोजी पंचायत समिती कार्यालय, मुदखेड येथे सकाळी १०:०० ते सायंकाळी ६:०० या वेळेत पार पडणार आहे. शिबिरामध्ये पात्र दिव्यांग व्यक्तींची तपासणी करून कृत्रिम हातपाय, कॅलिपर्स व इतर सहाय्यक साहित्याकरिता मोजमाप घेण्यात येणार असून काही साहित्याचे तात्काळ वितरणही करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. या शिबिरामुळे ग्रामीण भागातील अनेक गरजू दिव्यांग व्यक्तींना मोठा दिलासा मिळणार असून त्यांच्या दैनंदिन जीवनात स्वावलंबन निर्माण होण्यास मदत होणार आहे. अनेक दिव्यांग नागरिक आर्थिक अडचणीमुळे महागडी उपकरणे घेऊ शकत नाहीत. अशा गरजू व्यक्तींना शासन व सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सहाय्य उपलब्ध करून देण्याचा हा महत्त्वपूर्ण उपक्रम असल्याचे सांगण्यात आले. शिबिरासाठी येताना लाभार्थींनी आधार कार्ड, यूडीआयडी कार्ड, राशन कार्ड, दिव्यांग प्रमाणपत्र, दोन पासपोर्ट फोटो तसेच इतर आवश्यक कागदपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे. तालुक्यातील तसेच शहरातील जास्तीत जास्त दिव्यांग बांधवांनी या शिबिरास उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन प्रहार संघटनेचे माजी तालुका प्रमुख अनिल शेटे पाटील तसेच प्रहार महिला अध्यक्ष सौ. केशरताई शंकरराव शिंदे यांनी केले आहे. तसेच दिव्यांग व्यक्तींना शासनाच्या विविध योजनांची माहिती, सहाय्यक साधनांची उपलब्धता व सामाजिक सक्षमीकरणासाठी अशा प्रकारची शिबिरे नियमितपणे आयोजित करण्यात यावीत, अशी अपेक्षाही नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# ट्रॅक्टरसाठी डिझेल घरपोच द्या : शिवाजी शिंदे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २५ मे -**

ट्रॅक्टर हे अत्यंत धिम्या गतीने चालणारे वाहन आहे व गावातून किंवा शेतापासून पेट्रोल पंपावर जाऊन डिझेल आणण्यासाठी बऱ्याच मोठ्या प्रमाणावर डिझेल खर्च होते. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी खास सुविधा म्हणून प्रत्येक पेट्रोल पंपावर एक मिनी टँकर ठेवावा आणि अशा टँकरने प्रत्येक गावात जाऊन थेट शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टरमध्ये डिझेलची विक्री करावी, अशी मागणी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव शिंदे यांनी केंद्रीय पेट्रोलियम आणि प्राकृतिक गॅस मंत्री हरदीप सिंह पुरी यांना व पंतप्रधान कार्यालयाला निवेदन देऊन केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कमीत कमी इंधन खर्च करा, असा संदेश दिला आहे. शेतकऱ्यांना आपल्या शेतातील कामासाठी वापरण्यात येत असलेल्या ट्रॅक्टरला ४० लिटर डिझेल आणण्यासाठी पेट्रोल पंपावर येण्या-जाण्यामध्ये १५ लिटर डिझेल विनाकारण जाळावे लागते. शिवाय शेतातील काम बंद करून ट्रॅक्टर घेऊन पंपावर इतर वाहनाप्रमाणे रांगेत उभे राहून पाच-सहा तास वेळ गमावावा लागतो. कारण पेट्रोल पंपावर कोणत्याही वाहनाशिवाय डिझेल दिले जात नाही. कोणालाही कॅनमध्ये डिझेल दिले जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना द्वार पोच डिझेल पोहोचवण्यासाठी प्रत्येक पंपावर एका मिनी टँकरची सुविधा उपलब्ध करून द्यावी किंवा प्रत्येक पंपासाठी एक मिनी टँकरचा इतर होतकरू तरूणांना परवाना द्यावा. स्टेट बँकेत किंवा कोणत्याही सरकारी बँकेमध्ये बँकेच्या कर्मचाऱ्यावरील कामाचा ताण कमी करण्यासाठी सीएसपी म्हणजेच सेवा केंद्र देण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणेच शेतकऱ्यांना डिझेलची द्वार पोच सेवा देण्यासाठी प्रत्येक पंपावर एक मिनी टँकर उपलब्ध करून द्यावा किंवा एका मंडळासाठी एक टँकर अशी काहीतरी तरतूद करावी. आता सध्या पूर्व मशागतीचे दिवस सुरू आहेत त्यामुळे एक दोन दिवस पण ट्रॅक्टर बंद राहिला तरी शेतकऱ्यांना त्याचा त्रास नाही, परंतु पेरणीच्या काळात एक तास सुद्धा ट्रॅक्टरने पेरणी थांबवली तरी उत्पादनात खूप मोठी घट येते. याशिवाय पावसाळ्यामध्ये थेट येणारे रस्ते बंद असतात, त्यामुळे पक्क्या रस्त्याने पेट्रोल पंपावर जाण्यासाठी आणखी जास्तीचे अंतर कापावे लागते. त्यामुळे पेट्रोल पंपावर जाऊन डिझेल आणण्यासाठी उन्हाळ्यापेक्षा जास्त वेळ लागतो. पेरणीच्या हंगामात पेरणीच्या कामात व्यत्यय येऊ नये म्हणून पेरणी हंगाम सुरू होण्यापूर्वीच टँकरचे परवाने देऊन शेतकऱ्यांना द्वार पोच जीपीएस सिस्टम बसवलेल्या मिनी टँकर चालवण्यास परवानगी उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी शिवाजीराव शिंदे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## उत्तम वाडीकर यांना शिवछत्रपती राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पूरस्कार

**बाऱ्हाळी**-येथील माजी सरपंच तथा पत्रकार उत्तम वाडीकर यांना



कोल्हापूर येथील दै. रोखठोक चा राज्यस्तरीय शिवछत्रपती राज्यस्तरीय आदर्श पत्रकार -२६ पूरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. कोल्हापूर येथे मान्यवरांच्या हस्ते पूरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. आपल्या लेखनीच्या बळावर अडल्या नडल्याना मदत करणे, अन्यायाच्या विरुद्ध उभे टाकत सर्व सामान्यांना न्याय मिळवून देण्याचे काम करणारे बा-हाळी नगरीचे माजी सरपंच तथा मराठी पत्रकार परीषदेचे मा. अध्यक्ष,धडाडीचे पत्रकार उत्तम वाडीकर यांना कोल्हापूर येथील दै. रोखठोक चा मानाचा शिवछत्रपती राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पूरस्कार जाहीर झाला आहे. दि. २७ मे २६ रोजी कोल्हापूर येथे डॉ. चंदकांत कवळेकर (उपमुख्यमंत्री, गोवा.), खा रामराव वडकुते, प्रशांत सातव( विक्रीकर आयुक्त,), डॉ. पंकज भिवटे( भाजपा प्रदेशकार्यकारणी सदस्य ), शिवराज नायकवडे ( सचिव,पश्चिम महाराट्र देवस्थान स. कोल्हापुर) यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकाच्या वतीने देण्यात आली आहे.पत्रकार उत्तम वाडीकर यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे..

## टेनिस बॉल क्रीकेट ज्युनियर संघ निवड चाचणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २५ मे -**

टेनिस बॉल क्रीकेट असोसिएशन ऑफ नांदेडच्या वतीने दि. २६ मे २०२६ मंगळवार रोजी अशोका प्री प्रायमरी स्कुल, कासारखेडा ता.जि. नांदेड येथे सकाळी ९ ते दु. १२ वा. या वेळेत जिल्हा टेनिस बॉल क्रीकेट संघ निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील निवड चाचणीत ज्युनियर गटातील मुले व मुली सहभाग नोंदवू शकतात आणि खेळाडूंचा जन्म दि. ३० जून २००७ नंतरचा असावा.

या निवड चाचणीत निवड झालेले खेळाडू लातूर जिल्हा टेनिस बॉल क्रीकेट असोसिएशन आणि टेनिस बॉल क्रीकेट असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने ४ ते ६ जून २०२६ कालावधीत उदगीर जि. लातूर येथे होणाऱ्या २४ व्या राज्यस्तरीय ज्युनियर टेनिस बॉल क्रीकेट स्पर्धेत नांदेड जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करतील.

# हिमायतनगर रेल्वे स्टेशन ठरत आहे जिल्ह्यातील आकर्षक व सुसज्ज स्थानक

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २५ मे -**

आदिलाबाद ते नांदेड रेल्वेमार्गावरील हिमायतनगर रेल्वे स्टेशन हे सध्या अत्यंत सुसज्ज, आकर्षक आणि आधुनिक सुविधांनी युक्त असे रेल्वे स्थानक म्हणून प्रवाशांचे लक्ष वेधून घेत आहे. विविध विकासकामांमुळे या स्टेशनला जिल्हास्तरीय रेल्वे स्थानकाचा दर्जेदार लुक प्राप्त झाला असून उद्घाटनाच्या प्रतीक्षेत असलेल्या या स्टेशनची सर्वत्र चर्चा सुरू आहे.

रेल्वे स्टेशनवर प्लॅटफॉर्म क्रमांक १ व २ साठी लिफ्टची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. अंदाजे ६०० मीटर फरशीकरण, ६०० मीटर कंपाउंड वॉल, ६०० मीटर टिनशेड तसेच दोन्ही बाजूंनी नळयोजनेची कामे पूर्ण झाली आहेत. याशिवाय थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, फ्रिज, प्रशस्त वेटिंग हॉल, सुंदर बाग-बगीचा, आकर्षक कमान, कारंजे तसेच वंदे भारत रेल्वेचे मॉडेल स्टेशनची शोभा वाढवत आहे.

नांदेडच्या धर्तीवर उभारण्यात आलेला गोल घुमट




विशेष आकर्षण ठरत आहे. हिमायतनगर येथील परमेश्वर मंदिराला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाल्याने मंदिराच्या धर्तीवरील शोभिवंत घुमट स्टेशन परिसरात उठून दिसत आहे. अद्याप सुमारे १० ते १५ टक्के कामे बाकी असून स्टेशन उद्घाटनाच्या अंतिम टप्प्यात आहे. ही माहिती रेल्वे कर्मचाऱ्यांकडून तसेच प्रत्यक्ष पाहणीदरम्यान समोर आली आहे. विविध कामांसाठी वेगवेगळे कंत्राटदार असल्याने एकूण खर्चाची अधिकृत माहिती मिळू शकली नाही.

हिमायतनगर रेल्वे स्टेशनवरून दररोज सरासरी ३,००० ते ३,५०० प्रवाशांची ये-जा होते. दोन पॅसेंजर, दोन कृष्णा एक्सप्रेस आणि दोन नंदीग्राम एक्सप्रेस अशा सहा गाड्या दररोज धावतात. याशिवाय संतरागाछी व पटना या दिशेने जाणाऱ्या दोन साप्ताहिक गाड्याही येथे थांबतात. नांदेड येथून मोठ्या प्रमाणात कर्मचारी हिमायतनगरला ये-जा करतात, तर विदर्भातील उमरखेड व महागाव तालुक्यातील प्रवासीही या स्टेशनचा मोठ्या प्रमाणात वापर करतात.

रेल्वे स्टेशनवरील वाढती वर्दळ लक्षात घेता येथे पोलीस चौकीची आवश्यकता व्यक्त केली जात आहे. तसेच पार्सल कार्यालय, एलईडी टीव्ही, डिजिटल कोच डिस्प्ले आदी सुविधांचीही गरज असल्याचे प्रवाशांचे मत आहे. विशेष म्हणजे, कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेल्या या देखण्या स्टेशनवर अद्याप प्रवाशांसाठी सुलभ शौचालय व मुतारीची सुविधा उपलब्ध नसल्याने अनेक प्रवासी आणि शहरवासीयांनी खंत व्यक्त केली आहे.

## पंचशील बुद्ध विहार हाडको येथे श्रामनेर प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**नवीन नांदेड-** भारतीय बोध महासभा नांदेड जिल्हा दक्षिणच्यावतीने पंचशील बौद्ध विहार को येथे दिनांक २५ मे ते ३ जून २०२६ या दहा दिवसाच्या कालखंडात श्रामणेर प्रशिक्षण शिबिराचे आयोजन संघनायक पूज्य बनते महाविरो महाथेरो तसेच पूजनी भान्ते बोधी धम्मो गोळेगाव व नाना बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. या शिबिरात सहभाग नोंदणी फीस ३०० रुपये राहील अशी माहितीआयोजकांनी दिली आहे. भारतीय प्राचीन संस्कृती ही तथागत बुद्धांची संस्कृती आहे म्हणून या संस्कृतीचा प्रचार, प्रसार करणे आपले आद्य कर्तव्य मानून सर्वसामान्य माणसाने किमान पंचशीलांचे आचरण करून शीलवान, सदाचारी आणि निर्व्यसनी जीवन जगण्याचा मार्ग इतरांना दाखवण्याकरिता भारतीय बौद्ध महासभा एकूण २४ संस्कार शिबिराचे आयोजन करत आह. या उदात भावनेने भारतीय बौद्ध महासभा नांदेड दक्षिण शहर शाखा सर्व तालुका शाखेच्या वतीने या श्रामनेर प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरास मार्गदर्शन करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभेचे पूजनय भंते महाविरो माहाथेरो व तसेच पूजेनीय भंते बोधी धम्मो गोळेगाव व नाना बागुल यांची उपस्थिती राहणार आहे. तेव्हा या शिबिरास १८ वर्षावरील उपासकांनी या श्रामनेर शिबिरात सहभाग घेऊन आपले जीवन शुद्ध बनवावे असे आव्हान करण्यात आले आहे. धम्माची चळवळ ही समाजाच्या दानावर चालत असते. हे लक्षात घेऊन या शिबिरास सर्व समाज बांधवांनी तन-मन-धनाने जास्तीत जास्त धम्मदान देऊन सहकार्य करावे असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष हौसाजी वारघडे, सरचिटणीस रत्नाकर महाबळे, कोषाध्यक्ष बि.डी. कांबळे, सुभाष डोंगरे ड्. गंगाधर ढगे, पीएन लोकरे यांनी केले आहे. तसेच सदरील श्रामनेर शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी पी एन वाघमारे, शामराव कांबळे, चंद्रकांत चौधरी, मारुती गोडबोले, विजय पंडित यांच्यासह नांदेड, लोहा कंधार मुखेड देगलूर, नायगाव बिलोली ,येथील सर्व पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

## बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर गोवंशीय जनावरांची कुर्बाणी टाळावी : माजी गटनेते जाहीरोद्दीन खान

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २५ मे -**

येत्या २७ मे रोजी मुस्लिम बांधवांचा पवित्र सण बकरी ईद (ईद-उल-अजहा) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या सणानिमित्त मुस्लिम समाजात कुरबाणी देण्याची धार्मिक परंपरा पाळली जाते. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे माजी गटनेते जाहीरोद्दीन खान यांनी मुस्लिम बांधवांना गोवंशीय



जनावरांची कुरबाणी न देण्याचे आवाहन केले आहे. जाहीरोद्दीन खान यांनी सोशल मीडियासह विविध माध्यमांतून प्रसिद्ध केलेल्या संदेशात म्हटले आहे की, देशातील कायदे तसेच इतर धर्मीय समाजाच्या धार्मिक भावना लक्षात घेऊन मुस्लिम समाजाने शांतता, सामाजिक सलोखा आणि बंधुभाव कायम ठेवण्याची भूमिका घ्यावी. बकरी ईदचा सण हा त्याग, श्रद्धा आणि मानवतेचा संदेश देणारा सण असून, कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी घेणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, शासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करूनच कुरबाणीची प्रक्रिया पार पाडावी, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि सामाजिक ऐक्य अबाधित राखण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असेही आवाहन त्यांनी केले आहे. किनवट शहरासह तालुक्यातील मुस्लिम बांधवांनीही कायद्याचे पालन करून शांततेत आणि सौहार्दपूर्ण वातावरणात बकरी ईद साजरी करावी, असे मत विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

# जल जीवन मिशन की 'जीव धोक्यात मिशन'?

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २५ मे -**

इस्लापूर येथे जल जीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या कामांमध्ये गंभीर निष्काळजीपणा समोर आला असून, गावातील हनुमान मंदिराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर जमिनीपासून सुमारे सहा इंच वर लोखंडी व्हॉल्व्ह उघडे ठेवण्यात आल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

सदर रस्ता हा गावातील अत्यंत वर्दळीचा मार्ग असून, येथे दिवसभर नागरिक, भाविक, विद्यार्थी तसेच वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. मात्र उंचावलेल्या व्हॉल्व्हला ठेच लागून नागरिक पडल्याच्या घटना



वारंवार घडत असल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

नियमानुसार पाणीपुरवठा योजनेतील व्हॉल्व्ह हे जमिनीच्या समतल पातळीमध्ये सुरक्षित चेंबरमध्ये बसविणे आवश्यक असते. त्यावर मजबूत झाकण, संरक्षणात्मक व्यवस्था व इशारा फलक लावणे बंधनकारक मानले जाते. मात्र संबंधित ठिकाणी कोणतीही सुरक्षा उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

स्थानिकांनी अनेक वेळा संबंधित ठेकेदाराला सूचना देऊनही दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे सांगितले जात आहे. काम पूर्ण करण्याच्या घाईत नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली.

या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करावी तसेच निष्काळजी काम करणाऱ्या कॉन्ट्रॅक्टरला ब्लॅकलिस्ट करण्यात यावे, अशी जोरदार मागणी आता नागरिकांतून होत आहे.

# शेतकऱ्यांना डिझेल मुबलक प्रमाणात उपलब्ध करून द्या : नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २५ मे -**

सध्या सर्वत्र शेतीच्या मशागतीची कामे ट्रॅक्टर च्या साहाय्याने सुरु आहेत. मात्र बिलोली शहरासह तालुक्यातील पंपावर डिझेल व पेट्रोल ची मोठी टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झालेला असून शेतीतील मशागतीची कामे पूर्णपणे खोळंबली आहेत. प्रशासनाने शेतकऱ्यांच्या कामासाठी पेट्रोल - डिझेल मुबलक प्रमाणामध्ये उपलब्ध करून देण्याची मागणी



बिलोली नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी तहसीलदार गजानन शिंदे यांना दिलेल्या निवेदनामध्ये केलेली आहे.

शेतीच्या मशागतीची कामे जलद व चांगल्या प्रकारे होण्यासाठी ट्रॅक्टर व यंत्राच्या साहाय्याने केली जातात.सध्या ही कामे सुरु असतानाच बिलोली शहर तथा तालुक्यामध्ये डिझेल - पेट्रोल ची तीव्र टंचाई निर्माण झालेली आहे.पंपावर आलेला साठा काही तासातच रिकामा होत असल्याने तेल मिळेनासे झाले आहे. त्यामुळे शेतीची कामे खोळंबली असून शेतकरी हवालदिल झाला आहे. हिच परिस्थिती असल्यास पेरणीची कामे कसे करणार? ह्या चिंतेमध्ये आहे.या बाबीची दखल घेत बिलोली नगरपरिषदेचे अध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी शुक्रवारी तहसीलदार गजानन शिंदे यांना भेटून शहर तथा तालुक्यातील सर्व पंपावर डिझेल व पेट्रोल चा मुबलक साठा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. येत्या दोन दिवसांमध्ये पुरवठा सुरळीत न झाल्यास दिनांक २६ मे रोजी तहसील कार्यलयसमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.यावेळी ट्रॅक्टर वाहनधारकांची उपस्थिती होती.